रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३४३
www.ramprahar.com
◆ बुधवार, १ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## खासगी शिकवणी, पूर्व प्राथमिक शाळांसाठी येणार कायदा



**मुंबई :** राज्यातील पूर्व प्राथमिक आणि शिकवणी वर्ग यांच्यासाठी प्रारूप अधिनियम तयार केले जात असल्याची माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली. राज्यातील शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्यासाठी सरकार अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असून पूर्व प्राथमिक शिक्षण, खासगी शिकवणी वर्गांचे नियमन, शाळांमधील मूलभूत सुविधा, शिक्षक प्रशिक्षण आणि अभ्यासक्रमात बदल यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुलांना सुरक्षित, खेळावर आधारित आणि बालकेंद्रित शिक्षण मिळावे यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याचे काम सुरू आहे. खासगी शिकवणी वर्गांसाठीही केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचा आणि इतर राज्यांतील कायद्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी स्वतंत्र कायदा आणला जाणार आहे.

**अंतरंग**
गोरेगावात इमारतीचा कॉलम कोसळण्याच्या स्थितीत/२
पोलादपूर नगरपंचायत कार्यालयाचा रस्ता बंद/५
राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्र विजेता/८

# उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का!

## आमदार सचिन अहिर शिंदेसेनेत; उपसभापतिपदाची उमेदवारी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केल्याची घटना ताजी असतानाच आता ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसला आहे. विधान परिषदेच्या उपसभापतिपदासाठी मंगळवारी (दि.३०) ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटाकडून अर्ज दाखल केला. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन अहिर यांच्या पक्षप्रवेशाबाबत माहिती देत उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

सचिन अहिर हे शिवसेना ठाकरे गटाचे अत्यंत विश्वासू आमदारांपैकी एक मानले जात होते. ते यापूर्वी वरळीमधून निवडून आले होते, मात्र आदित्य ठाकरे राजकारणात येणार म्हटल्यावर त्यांनी आपला मतदारसंघ त्यांच्यासाठी सोडला होता. त्यानंतर ते विधान परिषदेवर गेले होते, मात्र आता त्यांना शिंदे गटाने उपसभापतिपदाचा आपला उमेदवार करून ऑपरेशन टायगर ३.०चा आपला पहिला वार केला आहे.



बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्ही तोडायला नाही, जोडायला आलो आहोत. काही लोक तुडवायला आले. आम्ही शिवसेना वाढवायला आलो आहे. आमचा अजेंडा खुर्ची नाही. पक्ष सोडून जाणाऱ्यांना शिव्या देण्यापेक्षा आत्मचिंतन करावे, असा टोला उद्धव ठाकरेंना यावेळी लगावला.

> *आम्ही जोपर्यंत एकत्र होतो, तोपर्यंत चांगले होतो. आता आम्ही वेगळे झालो की कसे नालायक आहोत हे सांगण्याचा प्रयत्न काही लोकांकडून होतो, ते दुर्दैवी आहे. वेगळ्या राजकीय मंचावरून त्यावर मी भाष्य करेन.*
> **–सचिन अहिर, आमदार**

दरम्यान, विधान परिषद उपसभापतिपदाच्या निवडणुकीसाठी आमदार अहिर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्ज दाखल केला.

# ११ कोटी रोप लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील वृक्षलागवड मोहिमेला अधिक प्रभावी आणि शाश्वत स्वरूप देणे आवश्यक आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, खासगी–सार्वजनिक सहभाग (पीपीपी), ग्रामपंचायतींचे वृक्षलागवडीचे नियोजन आणि विविध विभागांचा समन्वय यावर भर देण्यात यावा. यंदा ११ कोटी रोप लागवडीचे उद्दिष्ट असून योग्य नियोजन आणि सर्व यंत्रणांच्या सहभागातून हे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली हरित महाराष्ट्र आयोगाच्या वृक्षारोपण मोहिमेची आढावा बैठक झाली. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री फडणवीस यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, विश्वेसरैया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा.आर.के. इंगळे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी प्रमोद बोंगीरवार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, वन अधिकारी हे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी श्री. परदेशी यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात व्ही बी–जी राम जी योजनेंतर्गत वृक्षलागवड वाढवण्यावर भर द्यावा. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचे नियोजन करून ग्रामसभेच्या ठरावाद्वारे वृक्षलागवडीचा आराखडा तयार करावा आणि तो केंद्र सरकारच्या पोर्टलवर अपलोड करावा. हे काम वेळेत पूर्ण झाल्यास वृक्षलागवडीच्या खर्चापैकी काही निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी आणि वन अधिकारी यांनी समन्वयाने प्रत्येक गावाचा आराखडा तयार करून उद्दिष्टे निश्चित करावीत. प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचा योग्य वापर करून नियोजनबद्ध वृक्षलागवड करावी. यासाठी जनजागृती मोहीमही राबविण्यात यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी रोपांच्या उपलब्धतेचाही आढावा घेण्यात आला. सध्या वन विभागाकडे सुमारे सहा कोटी रोपे उपलब्ध असून पुढील वर्षापर्यंत ही क्षमता १० कोटी रोपांपर्यंत वाढवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी खासगी रोपवाटिकांचा पीपीपी तत्त्वावर सहभाग वाढविण्यात येणार आहे. रोपांचे उत्पादन, विक्री आणि वितरणात खासगी गुंतवणूक वाढेल, तर वन विभाग मूळ नियोजन आणि गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी पार पाडेल, असे यावेळी वन विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

कृषी विभागाच्या वतीनेही रोपांची निर्मिती करण्यात येत असून कृषी विद्यापीठाकडील रोप वाटिकेमधून सुमारे १५ लाख रोपांची निर्मिती करण्यात येत आहे तसेच खासगी मान्यताप्राप्त रोपवाटिकेमधून दोन कोटी ६६ लाख रोपांची निर्मिती करण्यात येत असल्याची माहितीदेखील कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली.

## मुंबईत स्कूल बसवर झाड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू, चौघे जखमी



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील चेंबूर येथील ११ नंबर रोडवर मंगळवारी (दि.३०) एका धावत्या शाळकरी मुलांच्या बसवर अचानक भलामोठा वृक्ष कोसळला. यामध्ये एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू, तर चौघे जखमी झाले आहेत. जखमी विद्यार्थ्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

टिळकनगरमधील युनिव्हर्सल शाळेची बस (एमएच ०३ सीव्ही ७४३९) दुपारी ३च्या सुमारास मुलांना घरी घेऊन जात असताना चेंबूरच्या हेरिटेज प्राईड परिसरात अचानक पिंपळाचे मोठे झाड या बसवर कोसळले. त्यामुळे बसचा वरचा भाग पूर्णपणे चेपला गेला. या घटनेची माहिती मिळताच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी, अग्निशमन दल आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले आणि सर्व १२ विद्यार्थ्यांना बसमधून बाहेर काढले.

यानंतर जखमी पाच विद्यार्थ्यांना चेंबूर येथील झेन रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान गंभीर जखमी असलेल्या ११ वर्षीय विहान श्रीवास्तवचा मृत्यू झाला. उर्वरित चार विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर आहे.

## विद्यार्थ्याचा शिक्षकावर चाकूहल्ला

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

शाळेतून टीसी (दाखला) काढण्यासाठी आलेल्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याने चक्क आपल्या वर्गशिक्षकावर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडली. जखमी शिक्षकाला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



प्राथमिक माहितीनुसार हल्ला करणारा विद्यार्थी अल्पवयीन असून तो शाळेतून आपला टीसी (शाळा सोडल्याचा दाखला) घेण्यासाठी आला होता. हा विद्यार्थी पूर्वी याच शाळेत शिकत असताना त्याचे वर्गशिक्षकासोबत काही कारणावरून वाद झाले होते. मंगळवारी तो टीसी घेण्यासाठी शाळेत आला तेव्हा पुन्हा एकदा त्याचा आणि संबंधित शिक्षकाचा वाद झाला. यावेळी विद्यार्थ्याने आपल्याजवळील चाकू काढून शिक्षकावर सपासप वार केले. अचानक घडलेल्या घटनेने शाळा परिसरात एकच खळबळ माजली. जखमी शिक्षकावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## निवडक

### जळगावमध्ये महिलेवर सामूहिक अत्याचार; १४ जण ताब्यात

**जळगाव :** जिल्ह्यातील फत्तेपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेवर दोन जणांनी सामूहिक अत्याचार, तर इतरांनी मोबाइलमध्ये चित्रण केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी १५पैकी १४ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. ४० वर्षीय पीडिता तिच्या मित्रासोबत देऊळगाव–कापूसवाडी रस्त्यावरील ठांबरडा नाल्याजवळील जंगल परिसरात २ जून रोजी गेली होती, तेव्हा ही घटना घडली. या प्रकरणातील एक आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### मुंबईतील हायप्रोफाइल वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

**मुंबई :** गिरगाव येथे पोलिसांनी सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. यात दोन अभिनेत्रींसह एका महिला मेकअप आर्टिस्टचा समावेश आहे. अभिनेत्रींपैकी एक मराठी चित्रपटांमधील मुख्य अभिनेत्री असल्याचे सांगितले जातेय, तर दुसरी बंगाली व बॉलीवूड चित्रपटांमध्ये छोट्या भूमिका साकारणारी आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली.

## एचएसआरपी नंबर प्लेटची मुदत संपली!

### आजपासून कारवाई



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात १ एप्रिल २०१९पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना हाय–सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याची ३० जून ही अंतिम मुदत संपुष्टात येत असून १ जुलैपासून विना एचएसआरपी नंबर प्लेट असलेल्या वाहनांवर परिवहन विभागाकडून कारवाई केली जाईल, असे राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार वाहनांची अचूक ओळख पटवणे, नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी रोखणे तसेच वाहनांशी संबंधित गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने एचएसआरपी प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

"आम्ही आतापर्यंत पाच वेळा मुदतवाढ दिली आहे, त्यामुळे आता पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही," अशा शब्दांत मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाची भूमिका मांडली. दरम्यान, परिवहन विभाग आणि ट्रॅफिक पोलिसांकडून राज्यभर धडक मोहीम हाती घेतली जाणार असून ज्या वाहनधारकांनी अजूनही एचएसआरपी नंबर प्लेट बसवलेली नाही, त्यांना आता दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार आहे, तथापि ३० जूनपर्यंत एचएसआरपी बसवण्यासाठी आगाऊ नोंदणी (अपॉइंटमेंट) केलेल्या वाहनधारकांना कारवाईतून सवलत देण्यात येणार आहे.

ज्यांनी अजूनही ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी कारवाई टाळण्यासाठी तातडीने ऑनलाइन नोंदणी करून नंबर प्लेट बसवून घ्यावी. यासंदर्भात अधिक माहितीसाठी किंवा तक्रारींसाठी परिवहन विभागाच्या अधिकृत पोर्टल अथवा dytccomp.tpt-mh@gov.in या ई–मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पनवेलमध्ये एसआयआर अभियानाबाबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदान विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियान अंतर्गत पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक मंगळवारी (दि. ३०) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पवन चांडक, सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महापालिका सदस्य, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मिनल भामरे, नानासाहेब कामठे, रमेश चव्हाण, संभाजी शेलार, उपायुक्त रविकिरण घोडके, महापालिका व महसूल अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी तथा पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदार यादी पुनरीक्षणाचे काम सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदारसंघातील एकूण ५७४ मतदान केंद्रांसाठी सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी केंद्रनिहाय बीएलए (बूथ लेव्हल एजंट) नियुक्त केले आहेत.



यावेळी मतदार नोंदणी अधिकारी चांडक यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या बीएलए फोन नंबर देण्याबाबत सूचना केल्या तसेच पुनरीक्षण कार्यक्रमाची रूपरेषा, जबाबदाऱ्या व प्रभावी अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संभाजी शेलार यांनी उपस्थितांना सादरीकरणाच्या माध्यमातून एसआयआर कार्यक्रमाची माहिती दिली. नागरिकांनी voters.eci.gov.in किंवा ECINet Appवर जाऊन स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासून ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले.

मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. बीएलओंना एन्युमरेशन फॉर्म (ईएफ फॉर्म) भरण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे तसेच जास्तीत जास्त मतदारांनी ईसीआयच्या पोर्टलवर सेल्फ एन्युमरेशन फॉर्म भरावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्राच्या ठिकाणी येत्या रविवारी (दि. ५) नागरिकांच्या सोयीसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांनी सहभागी व्हावे व आपले एन्युमरेशन फॉर्म भरून घेण्यासाठी सहकार्य करावे, असेही आवाहन केले गेले आहे.

### कर्करोग तपासणीसाठी फिरत्या मोबाइल व्हॅनची सुविधा


## रायगड जिल्ह्यात जुलै महिन्यात तपासणी शिबिरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कर्करोगाच्या तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातर्फे फिरत्या मोबाइल व्हॅनची सोय करण्यात आली आहे. जुलै महिन्यात जिल्ह्यामध्ये या व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे.

तीन कर्करोग प्रकारांमध्ये मुख कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशय मुख कर्करोगाचे सर्वाधिक रुग्ण नोंदवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी ही मोहीम मोफत आहे. शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेल्या विशेष कर्करोग तपासणी वाहनामध्ये डेंटल चेअर, गर्भाशय, मुख तपासणीसाठी आवश्यक बेड तसेच विविध वैद्यकीय साधनसामग्री उपलब्ध आहे.

संबंधित व्हॅन जिल्ह्यातील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जाऊन तपासणी शिबिर घेतले जाते. शिबिरांतून मुख कर्करोगासाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि आवश्यक असल्यास ओरल बायोप्सी, स्तन कर्करोगासाठी क्लिनिकल तपासणी आणि मेमोग्राफीसाठी रुग्णालयात विनामूल्य संदर्भ, गर्भाशय मुख कर्करोगासाठी तपासणी आणि पॅप स्मीअर चाचणी केली जात आहे.



जुलै महिन्यात या व्हॅनच्या माध्यमातून पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, तळा, माणगाव, पोलादपूर, महाड, रोहा, अलिबाग, पेण व उरण या तालुक्यांतील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रांत तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

### असे आहे वेळापत्रक

- **पनवेल :** २ जुलै उपकेंद्र वावेघर, ३ जुलै उपकेंद्र वाजे
- **कर्जत :** ४ जुलै प्रा.आ.केंद्र खांडस, ६ जुलै उपकेंद्र पिंगळस
- **खालापूर :** ७ जुलै ग्रामीण रुग्णालय चौक, ८ जुलै माता–बाल आरोग्य केंद्र खोपोली, ९ जुलै नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र खोपोली
- **सुधागड :** १० जुलै उपकेंद्र नाडसूर
- **तळा :** ११ जुलै प्रा.आ. केंद्र मांदाड, १३ जुलै उपकेंद्र पन्हेळी
- **माणगाव :** १४ जुलै उपकेंद्र मोर्बा, १५ जुलै उपकेंद्र मांजरवणे, १६ जुलै उपकेंद्र येलवडे
- **पोलादपूर :** १७ जुलै प्रा.आ.केंद्र पितळवाडी, १८ जुलै उपकेंद्र सवाद
- **महाड :** २० जुलै प्रा.आ.केंद्र बिरवाडी, २१ जुलै उपकेंद्र भावे, २२ जुलै उपकेंद्र विन्हेरे
- **रोहा :** २३ जुलै उपकेंद्र मेढा, २४ जुलै उपकेंद्र संभे
- **अलिबाग :** २५ जुलै प्रा.आ.केंद्र रेवदंडा, २७ जुलै उपकेंद्र खंडाळे
- **पेण :** २८ जुलै उपकेंद्र शिर्की, २९ जुलै उपजिल्हा रुग्णालय पेण
- **उरण :** ३० जुलै उपकेंद्र चिरनेर.

### टीईटी पेपरफुटी

## सूत्रधाराच्या पत्नीला अटक

**भिवंडी : प्रतिनिधी**

टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षेच्या पेपरफुटीप्रकरणी चौथ्या आरोपीला अटक करण्यात ठाणे पोलिसांच्या पथकाला यश आले आहे. मुख्य फरार आरोपी बिजेंदर गुप्ता याची पत्नी सुमन कुमारी गुप्ता हिला पोलिसांनी पाटणा येथून ताब्यात घेतले.

मुख्य फरार आरोपी बिजेंदर गुप्ता हा या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार असून त्याचा यापूर्वी ओडिशा टीईटी पेपरफुटी प्रकरणात सहभाग होता. सुमन कुमारी गुप्ता आपल्या पतीसोबत संपर्कात होती. त्यामुळे तिच्या खात्यावरही पैशांचा व्यवहार झाल्याचा संशय पोलिसांना आहे. तिला मंगळवारी (दि.३०) भिवंडी न्यायालयात हजर केले असता ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## रायगडात पावसाची संततधार



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि.३०) पावसाची दिवसभर संततधार सुरू होती. अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी येत होत्या. माणगाव परिसरात जोरदार पाऊस पडून ढालघर फाटा येथे महामार्गावर पाणी साचल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला.

हवामान विभागाने पुढील २४ तासांतही रायगडसह कोकणात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नदीकाठावरील तसेच डोंगरउतारावरील गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. संभाव्य पूरस्थिती, दरड कोसळण्याच्या घटना आणि सखल भागांमध्ये पाणी साचण्याची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने नागरिकांना विनाकारण घराबाहेर न पडण्याचे, पूरग्रस्त रस्ते किंवा पुलांवरून प्रवास टाळण्याचे तसेच आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### शेतीसाठी पूरक!

पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असले तरी वरुणराजाने दमदार हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला आहे. रोपांची उगवण चांगली आहे. सध्या पडत असलेला पाऊस शेतीला पूरक आहे. त्यामुळे शेतीकामांना वेग आला आहे. पाणीसाठे आणि भूजल पातळीच्या दृष्टीने हा पाऊस अत्यंत लाभदायक ठरत आहे.

# ‘एल निनो’चे संभाव्य संकट जलसंधारणासाठी इष्टापत्ती -मुख्यमंत्री



## कमी कालावधीत पूर्ण होऊ शकणारी कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश

**मुंबई: प्रतिनिधी**

विविध हवामान संस्थांनी या वर्षीच्या पावसाळ्यामध्ये ‘एल निनो’बाबत दिलेल्या इशाऱ्यांबाबत शासन गंभीर आहे. यामुळे निर्माण होऊ शकणारी संभाव्य टंचाई परिस्थिती यशस्वीपणे हाताळण्यासाठी शासन सज्ज आहे. त्यामुळे एल निनोचे संभाव्य संकट हे जलसंधारणासाठी इष्टापत्ती असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कमी कालावधीमध्ये पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

विधान भवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा (कृष्णा आणि गोदावरी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड उपस्थित होते.

राज्यामध्ये नादुरुस्त असलेले कोल्हापुरी बंधाऱ्यांना प्राधान्याने दुरुस्त करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नादुरुस्त असलेले कोल्हापुरी बंधारे ‘आर्च पद्धतीने ‘ पुलवजा करण्याबाबत पडताळणी करण्यात यावी. जलसंधारणाचे कुठलेही नवीन काम न घेता दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करावी. आपत्ती व्यवस्थापन विभागाने मागील वर्षांमध्ये महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थिती असलेले भाग चिन्हांकित करावे. संबंधित भागात तत्कालीन परिस्थितीमध्ये राबविण्यात आलेल्या उपाययोजनांच्या अहवाल द्यावा. त्यावर आधारित किंवा आवश्यक ते बदल करून यावेळी उपाययोजना करण्यात याव्यात.

कामे पूर्ण करण्यास असलेला कालावधी लक्षात घेता या कामांसाठी गतीने प्रक्रिया राबवावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधारे दुरुस्त करण्यासाठी जिल्हा नियोजनमधून निधीची तरतूद करण्यात यावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये दुरुस्ती करताना धातू विरहित पद्धतीचा पर्याय शोधण्यात यावा. ही उपाययोजना कायमस्वरूपी असावी. याबाबत यंत्रणा निश्चित करून संबंधित यंत्रणेकडे संपूर्ण जबाबदारी देण्यात यावी. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता लवकर पूर्ण होतील, अशीच जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत. याबाबत संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार पाटबंधारे विकास महामंडळ स्तरावर देण्यात यावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांसोबतच जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यात यावे. यासाठीही कार्यक्रम हाती घेण्यात यावा. राज्यामध्ये कृषी क्षेत्रात सौर ऊर्जा निर्मितीची चांगली परिसंस्था निर्माण होत आहे. यामधून निर्मित होणारी सौर ऊर्जेचे वितरण करण्यात यावे. त्यामुळे पारेषण व्यवस्थित होऊन महावितरणच्या यंत्रणेवर ताण येणार नाही. सौर ऊर्जा विषयक उपकरणांच्या दुरुस्तीसाठी संबंधित गाव, पाड्यात दुरुस्तीबाबत कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यात यावा. यामुळे स्थानिक बेरोजगार युवक युवतींना रोजगारही उपलब्ध होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या कृषीसाठी विजेचा जास्त वापर असलेल्या जिल्ह्यांसाठी वेगळे नियोजन करण्यात यावे. येथील ‘फिडर’वर लोड येऊन ‘फिडर’ बंद पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा होत नाही. या जिल्ह्यांमध्ये ‘फिडर’ वर दबाव न येता विजेचे वहन एका फिडरवरून दुसऱ्या फिडरवर करता येईल, अशा पद्धतीने व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

बैठकीस मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते, तर विदर्भ, तापी, गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

राज्यामध्ये जलसंपदा विभाग आणि मृद व जलसंधारण विभागाकडे कोल्हापुरी बंधारे आहेत. त्यापैकी ९७६ कोल्हापुरी बंधारे जलसंपदा विभागाकडे असून मृद व जलसंधारण विभागाकडे १३६७ कोल्हापुरी बंधारे आहेत. यापैकी नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीनंतर २ लाख ३९ हजार १८१ हेक्टर सिंचन क्षमता राज्यात निर्माण होणार आहे.

## गोरेगावातील अलहसन इमारतीचा कॉलम कोसळण्याच्या स्थितीत; २६ कुटुंबीयांना प्रशासनाने हलविले



**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील अलहसन इमारतीच्या मधल्या कॉलमचे काँक्रीट पूर्णपणे निखळून पडल्याने आतील स्टीलचे बार वाकलेले (बेंड) असल्याचे सोमवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आले. या घटनेमुळे इमारतीत रहाणार्या १२६ रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे .

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, ही सोसायटी नोंदणीकृत असून गोरेगाव ग्रामपंचायत दरवर्षी या इमारतीला धोकादायक इमारत म्हणून नोटीस बजावत असली, तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन व महसूल प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनानाच्या मार्गदर्शनाखाली रहिवाशांचे स्थलांतरणाचे काम सुरु असून जवळपास २५ कुटुंबातील रहिवाशांनी आपल्या नातेवाईकांकडे स्थलांतर करण्याची तयारी सुरु केली आहे तर इतर कुटुंबियांना उर्दू प्राथमिक शाळेत हलवीण्यात आले.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, ही इमारत २०१२ मध्ये बिल्डर अब्दुला सरखोत यांनी बांधली होती. तसेच इमारतीच्या देखभालीसाठी दरमहा प्रत्येकी ५०० रुपये देखभाल शुल्क आकारलेजात असल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे. दरवर्षी धोकादायक इमारतीच्या नोटिसा देऊनही संबंधित यंत्रणांनी कारवाई का केली नाही? इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेची तपासणी कोणी केली?आणि या गंभीर प्रकाराला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

## श्रीवर्धन शहरात विजेचा खेळखंडोबा, नागरिक त्रस्त

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये विजेचा खेळ खंडोबा सुरू असून, वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. महावितरणने पावसाळ्यापूर्वी अनेक वेळा संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा बंद ठेवून देखभाल व दुरुस्तीची कामे केली होती. परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणावर देखभाल व दुरुस्तीची कामे करून सुद्धा पावसाळा सुरू झाल्यानंतर दरवर्षीप्रमाणे महावितरणच्या विजेचा खेळ खंडोबा सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे.



शहरामध्ये सतत कोणत्या ना कोणत्या भागामध्ये वीज वाहकतारा तुटणे, कंडक्टर तुटणे यासारखे प्रकार घडत आहेत. दोन दिवसापूर्वी चौकर पाखाडी येथून दांडे परिसराकडे जाणाऱ्या भूमिगत उच्च दाबाच्या विजवाहिन्या जळाल्यामुळे त्या ठिकाणचा वीज पुरवठा जवळजवळ दीड दिवस खंडित होता.

दोन दिवस मुसळधार कोसळल्यानंतर पावसाने देखील दडी मारली आहे. त्यामुळे हवेमध्ये उष्म्याचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु वारंवार खंडित होत असलेला वीज पुरवठा त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कारण अनेकांचे इन्व्हर्टर बॅकअप देखील वारंवार वीज पुरवठा खंडित होण्यामुळे बंद पडत आहेत. महावितरण कडून बिले वसुली करण्यासाठी धडक मोहीम राबविली जाते. तर आता नवीन स्मार्ट मीटर बसल्यामुळे वीज बिल भरणा वेळेवर न केल्यास वीज पुरवठा आपोआप बंद होतो. मात्र वसुलीसाठी एवढे सगळे पर्याय महावितरण कडे उपलब्ध असताना ग्राहकांना मात्र सुरळीत वीज पुरवठा का पुरविला जात नाही? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

श्रीवर्धन शहरातील भौगोलिक परिस्थिती पाहता या ठिकाणी नारळाची किंवा सुपारीची झाडे रस्त्यालगत असल्यामुळे त्याचे पान वायरवर पडल्यावर वीज पुरवठा खंडित होतो. परंतु ज्या वेळेला खूप वारा व पाऊस असतो त्याच वेळेला अशा घटना घडत असतात. तरी महावितरणने आपला वीज पुरवठा सुरळीतपणे ग्राहकांना पुरवता येईल.

# माणगाव उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांचा सेवापूर्ती सोहळा

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

दक्षिण रायगडचे केंद्रबिंद असलेल्या माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे १२० बेडचे आहे .रुग्णालयात विविध विभागात एकूण २२ डॉक्टर कार्यरत आहेत. या रुग्णालयातील आयुष ओपीडीचे डॉ. दीपक देशमुख व भुलतज्ञ डॉ. सावंत यांची १ जुलै रोजी सेवापूर्ती होत असल्याने ३० जून रोजी त्यांचा माणगाव उपजिल्हा रुग्णालयात सेवापूर्ती आयोजित करण्यात आला होता.



यावेळी डॉ. दीपक देशमुख व डॉ सावंत ह्यांनी उपजिल्हा रुग्णालयात बजावलेल्या सेवेबद्दल त्यांचा रुग्णालयातील सर्व विभागातील डॉक्टर व कर्मचारी यांच्या वतीने शाल, श्रीफळ, उत्कृष्ठ रुग्णसेवा म्हणून सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रुग्णालयातील प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ संतोष कामेरकर यांनी स्वीकारले. तर या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ महेश मेहता यांनी तर सूत्रसंचालन उपजिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढी इन्चार्ज मनीषा नवले यांनी केले.

या कार्यक्रमासाठी रुग्णालयातील डॉ शैलेश बर्फे, अस्थिरोग तज्ञ डॉ अभिजीत मेहता, डॉ जगदीश पटेल, डॉ मृणालिनी वाढवळ, डॉ.रजनीश, डॉ.सनगे,डॉ दुबे व नेत्ररोग तज्ञ डॉ गाजरे, अपघात विभागातील सर्व डॉक्टर, शस्त्रक्रिया विभागातील सर्व डॉक्टर व कर्मचारी, अतिदक्षता विभागातील डॉक्टर व कर्मचारी, रक्त तपासणी प्रयोगशाळेतील अधिकारी व कर्मचारी, सिटी स्कॅन विभागातील कर्मचारी, प्रसूती विभागातील कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, सर्व अधिपरिचारिका, अधिपरिचारक, राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी व डॉक्टर, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम डॉक्टर व कर्मचारी, समाजसेवक संतोष खाडे, विद्युत पर्यवेक्षक गांधी उपस्थित होते

डॉ. महेश मेहता यांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ दिपक देशमुख यांचे आयुष विभागात ओपीडी करताना रुग्णसेवा करण्याचे कसब आणि कला आणि नियोजन याचे कौतुक केले तर आपण सेवानिवृत्त होत नाहीत तुमच्या वरिष्ठ स्नेही मंडळींच्या आदेशाने पुन्हा उपजिल्हा रुग्णालयात सेवेत रुजु व्हाल असा आशावाद व्यक्त केला.

भूलतज्ज्ञ डॉ सावंत यांची काम करण्याची कला,रात्री अपरात्री त्यांच्याकडून होणारी रुग्णसेवा आणि त्यांचे वयमान यांचे सूत्र सांगून आदर व्यक्त करत त्यांनी उपजिल्हा रुग्णालयात केलेल्या कामाची स्तुती आणि गौरव केला. तसेच डॉ महेश मेहता म्हणाले की,३० जून ला डॉ देशमुख व डॉ सावंत यांचा सेवापूर्ती कार्यक्रम आणि १ जुलै ला डॉक्टर डे हे दोन कार्यक्रम दुग्धशर्करा योग म्हणून एकत्रित करण्यात येत आहेत.

## प्रजापती समाज विकास मंडळातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ, राष्ट्रीय सामाजिक संस्था (NGO) यांच्या वतीने संस्था व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही रायगड जिल्ह्यातील पनवेल शहर व परिसरातील विविध भागांत शिक्षण घेणाऱ्या सुमारे १६० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, समाजसेवक तसेच मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रप्रताप प्रजापती (राष्ट्रीय अध्यक्ष), डॉ. भगवानदास प्रजापती गजेंद्र प्रजापती, डॉ. ज्ञानप्रकाश प्रजापती, इंद्र प्रजापती, राजेंद्र प्रसाद प्रजापती लवकुमार प्रजापती, भगवानदास प्रजापती, तसेच संजय प्रजापती, आदींनी विशेष परिश्रम घेतले.



## भिवपुरी रोड स्टेशनजवळ सिग्नलमध्ये बिघाड; चिंचवली फाटक पाऊण तास बंद

**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या भिवपुरी रोड रेल्वे स्थानक परिसरात मंगळवार, ३० जून रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास सिग्नल यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्याने रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. कर्जतच्या दिशेने जाणाऱ्या डाऊन मार्गावरील सिग्नलमध्ये बिघाड झाल्यामुळे अनेक मेल, एक्स्प्रेस आणि प्रवासी गाड्यांचा वेग मंदावला. त्यामुळे काही गाड्या १० ते १५ मिनिटे उशिराने धावल्या, तर काही गाड्यांना मार्ग मोकळा होईपर्यंत स्थानकाजवळ थांबवून ठेवण्यात आले.



या तांत्रिक बिघाडाचा सर्वाधिक फटका भिवपुरी रोड स्थानकाजवळील चिंचवली रेल्वे फाटकाला बसला. सलग मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांची वाहतूक सुरू असल्याने हे फाटक तब्बल पाऊण तास बंद ठेवावे लागले. परिणामी दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.

फाटक बंद असल्यामुळे वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागला. काहींना आंबिवली मार्गे सुमारे ४ किलोमीटरचा, तर काहींना कडावकशेळे मार्गे सुमारे १२ किलोमीटरचा अतिरिक्त फेरा मारावा लागला. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, कामगार आणि प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

दरम्यान, अप आणि डाऊन मार्गावरील काही मालगाड्यांना भिवपुरी रोड स्थानकाच्या साईडिंग लाईनवर थांबवून ठेवण्यात आले होते. सिग्नल यंत्रणा पूर्ववत झाल्यानंतर रेल्वे वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली आणि पाऊण तासानंतर रेल्वे सेवा पूर्वपदावर आली.

# नायक मराठा समाज महाड तालुका बांधकाम उपाध्यक्षपदी नामदेव उतेकर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाड तालुका नायक मराठा समाज सेवा संघ समितीची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली असून या निवड प्रकियेमध्ये वाळण विभागातील वाळण खुर्द या गावाचे ह.भ.प.श्री.नामदेव भिवसेन उतेकर यांची महाड तालुका नायक मराठा समाज सेवा संघ समितीच्या बांधकाम उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

तर सुधाकर कृष्णा चिकणे व नयना सचिन उत्तेकर यांची सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे.


नामदेव उत्तेकर, सुधाकर चिकणे, नयना उत्तेकर यांचा (रविवार दि.२८ जून) रोजी विठ्ठल रखुमाई मंदिर उत्तेकरवाडी येथे वाडीच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमाला वाडीतील नागरिक, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ज्येष्ठ पत्रकार चंद्रशेखर कुलकर्णी यांचे निधन

**मुंबई: प्रतिनिधी**

ज्येष्ठ पत्रकार चंद्रशेखर तथा चंदू कुलकर्णी यांचे मंगळवारी पहाटे दोन च्या सुमारास दादर येथील सुश्रुषा रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र दिनकर शिर्के यांनी .कुलकर्णी यांच्या निधनामुळे मुंबई मराठी पत्रकार संघाने एक हितचिंतक, मार्गदर्शक गमावला असल्याचे सांगून त्यांच्या कुटुंबियांप्रती सहभावना आणि मुंबई मराठी पत्रकार संघाकडून त्यांना विनम्र श्रद्धांजली वाहिली. त्यांचे अंतिम संस्कार बुधवार १ जुलै २०२६ रोजी सकाळी दादर येथे होणार असून तत्पूर्वी मकरंद सहनिवास, दादर येथील निवासस्थानी त्यांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.



# पथविक्रेत्यांसाठी सुवर्णसंधी! उद्या कामोठ्यात पीएम स्वनिधी मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागामार्फत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत "लोक कल्याण मेळावा"चे आयोजन गुरुवारी (दि. २) सकाळी ११ वाजता सुवर्णदुर्ग, कामोठे, नवीन प्रभाग कार्यालय, सेक्टर-११ येथे करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये पात्र पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज, डिजिटल व्यवहारांवरील प्रोत्साहन तसेच विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

याशिवाय "स्वनिधी से समृद्धी" अभियानांतर्गत जनधन योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, श्रमयोगी मानधन योजना, वन नेशन वन रेशन कार्ड, मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना आदी विविध शासकीय योजनांची माहिती व लाभही या मेळाव्यात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पनवेल महानगरपालिका महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व पात्र पथविक्रेते, फेरीवाले व नागरिकांनी या विशेष अभियानाचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## *अशी आहे योजना*

***प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेअंतर्गत पात्र पथविक्रेत्यांना प्रथम टप्प्यात १५,०००, द्वितीय टप्प्यात २५,००० आणि तृतीय टप्प्यात ५०,००० पर्यंत कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. तसेच डिजिटल व्यवहार करणाऱ्या पथविक्रेत्यांना वार्षिक १,२०० पर्यंत कॅशबॅकचा लाभ मिळत आहे.***

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-जेएनपीटी मार्गावरील जांभूळपाडा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातानंतर त्यांना धडक देणाऱ्या वाहनचालकाने पलायन केले असून पनवेल शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. या अपघातातील दोन्ही मृत व्यक्तींची ओळख पटली नसल्याने पोलिसांनी त्यांची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

अपघातात मरण पावलेले दोन्ही व्यक्ती पनवेल-जेएनपीटी मार्गावरील जांभूळपाडा येथून जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. दोघेही गंभीर जखमी झाल्याने पोलिसांनी त्यांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयामध्ये दाखल केले, मात्र त्यापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला होता.

## कॅबमध्ये हरवलेले सोने परत

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदई गाव येथे राहणाऱ्या तसेच नवीन लग्न झालेल्या आर्या सावंत सायंकाळी पतीसह जोगेश्वरी ते आदई गाव असा कॅबने प्रवास करून घरी आल्या असता त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चेन कुठेतरी पडल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने खांदेश्वर पोलीस ठाण्यात येऊन याबाबत कळवले. तक्रारीनंतर पोलिसांनी त्वरित कारवाई करत कॅब चालक अनिकेत गाढवे (राहणार पुणे) यांना पोलीस ठाण्यात बोलावले. कॅबची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये सोन्याची चेन मिळून आली. पोलिसांनी ती आर्या सावंत यांना परत केली.

## पनवेल महापालिका क्षेत्रात पोलिओ लसीकरणास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका क्षेत्रात रविवारी (दि. २८) राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. या पोलिओ लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य प्रिती जॉर्ज, दर्शना भोईर, सुमित झुंझारराव, स्नेहल ढमाले-पाटील उपस्थित होते. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाने या मोहिमेचे सुयोग्य नियोजन केले होते.

एकूण ४१२ बुथवर ० ते ५ वर्षे वयोगटातील ६४ हजार ५६९ बालकांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी रविवारी ६१ हजार २२७ बालकांना पोलिओ डोस देण्यात आला, म्हणजेच ९५ टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले.लसीकरण मोहिमेसाठी २६ नागरी आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात ३९२ स्थायी, २३ ट्रान्झिट आणि ४५ मोबाईल पथके अशा विविध माध्यमांतून नियोजन करण्यात आले. तसेच एकूण ४१२ पोलिओ बूथ उभारण्यात आले होते. या संपूर्ण मोहिमेसाठी १,०८४ मनुष्यबळ कार्यरत होते. रेल्वे स्टेशन, बसस्थानके तसेच इतर गर्दीच्या ठिकाणी ट्रान्झिट व मोबाईल पथके तैनात करण्यात आली होती.

यासाठी वैद्यकीय अधिकारी, एएनएम, आशा सेविका आणि स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि आरसीएच अधिकारी डॉ. गणेश नायर यांनी मोहिमेचे सूक्ष्म नियोजन केले. या मोहिमेदरम्यान लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांसाठी महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पुढील चार दिवस विशेष पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचे डोस देऊन या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## ७१व्या वर्षी चंद्रकांत जाधव यांनी पदविका अभ्यासक्रम केला पूर्ण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



शिक्षणाला वयाची अट नसते, तर जिद्द आणि चिकाटीची गरज असते हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे नवी मुंबईतील चंद्रकांत बळवंत जाधव यांनी. अंजुमन इस्लामचे डॉ. ए.आर. कळसकर पॉलिटेक्निक, नवी मुंबईतील एक नावाजलेले तंत्रनिकेतन 'पदविका' अभ्यासक्रमावर आधारित महाविद्यालय असून शैक्षणिक वर्ष सन २०२४ मध्ये डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनीअरिंगच्या द्वितीय वर्षामध्ये एका विद्यार्थ्याने प्रवेश घेतला. त्यांचे नाव चंद्रकांत बळवंत जाधव, वय वर्ष ७०. प्रवेश देण्याआधी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आरिफ शेख यांनी त्यांची जुजबी विचारपूस करून त्यांच्यातील शिक्षणाबद्दलची आवड व ओढ जाणून घेऊन प्रवेशाचे सोपस्कर पूर्ण करून त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रवेश दिला.

खरंच शिक्षणाला वयाची अट नसते तर जिद्द आणि चिकाटीची गरज असते. घरापासून महाविद्यालयाचे अंतर तो दररोज नियमितपणे रिक्षाने येजा करत. नियमित येणे, वेळेवर येणे, उपस्थितीचे प्रमाण १००% ठेवणे, वर्गात दिलेला अभ्यास वेळेवर पूर्ण करणे. वर्गातील सहपाठी वयाने जरी कमी असले तरी त्यांच्याशी सौहार्दपूर्ण संवाद साधून आपल्या अभ्यासातील अडीअडचणी दूर करणे, अध्यापक वर्गाशी जुळवून घेणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष उल्लेखनीय पैलू होते. घरात सुना, जावई, लहान नातवंडे असताना व कुटुंबाची सर्वांगीण परिस्थिती समाधानकारक असताना इतक्या गर्दीच्या वातावरणात नियमित अभ्यासासाठी पुरेसा वेळ काढावा म्हणजे कसरतच करावी लागे. अशा अवस्थेत देखील आपल्या ध्येय, उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केलेले परिश्रम वाखाणण्याजोगे आहे.

तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून त्यांनी अंतिम वर्षात वयाच्या ७१व्या वर्षी ८४% टक्के गुण संपादन करून एक नवीन इतिहास रचला आहे. त्यांच्या या भरीव व आखीव कामगिरीचा नवीन पिढीतील विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा असे हे एकूण शिक्षणासाठीची आवड व तडप आहे. त्यांचे यापुढे पदवी डिग्री करण्याचे मानस आहे. ते ही अंजुमन इस्लामचे कळसकर टेक्निकल कॅम्पसमध्ये. संस्थेबद्दल त्यांच्या मनामध्ये खूप प्रेम व आदर आहे. संस्थेने मला खूप भरभरून दिले आहे. त्यामुळे मी माझ्या शिक्षणाची भूक भागवू शकलो, असे ते सांगतात.संस्थेच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान सत्कार करून रोहना शेख, सेवानिवृत्त पोलीस आयुक्त मुंबई यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

जाधव यांच्या या यशामागे संस्थेचे अध्यक्ष जहीर अया काजी (पद्मश्री २०२४) व चेअरमन बुरहान हरीस व कळसकर टेक्निकल कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. रमजान खाटीक व प्राचार्य आरिफ शेख यांचे कडून मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच त्यांना चांगले आरोग्य व उदंड आयुष्याचा लाभ मिळो व त्यांची अशीच पदोपदी उन्नती होवो ही सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाची एनआयई प्रेसला भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी ऐरोली येथील एनआयई प्रिंटींग प्रेसला मंगळवारी (दि.३०) भेट देत कार्यपद्धती जाणून घेतली.

या भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी वृत्तपत्र छपाईची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली. आधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने वृत्तपत्राचे मुद्रण, रंगसंगती, प्लेट तयार करणे, कागदाची हाताळणी, गुणवत्ता नियंत्रण तसेच छपाईनंतरचे पॅकिंग व वितरणाची प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रिंटिंग उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्पादन व्यवस्थापनाची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मिळाली.

याबाबत माहिती देताना प्राचार्य निशा नायर यांनी सांगितले की, या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली आहे. विद्यार्थ्यांनी ही भेट अत्यंत उपयुक्त, ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त केली. लिटरेचर क्लबने या भेटीचे आयोजन केले होते.

## रवींद्र भोईर यांचा सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या वतीने सत्कार

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर यांची रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक धनाजी पाटील व ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी गव्हाण विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे व उपशिक्षिका दर्शना माळी उपस्थित होते.



**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना रक्तदान शिबिराचे सन्मानचिन्ह देताना मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, डॉ. ययाती गांधी, सचिव बी.पी. म्हात्रे, उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, कोषाध्यक्ष विजय द. गायकर.**

## पनवेलच्या बाजारात रानभाज्या दाखल; वाढलेल्या दरांमुळे ग्राहकांची खरेदी मर्यादित

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्याची चाहूल लागताच पनवेल तालुक्यातील बाजारपेठांमध्ये विविध रानभाज्यांचे आगमन सुरू झाले आहे. शेवळ, पेठारी, भोकर, करांदे, हुलगुंड, कोळी यांसारख्या पारंपरिक रानभाज्या विक्रीसाठी बाजारात दाखल झाल्या असून त्यांना नागरिकांकडून चांगली मागणी आहे, मात्र यंदा कधी ऊन तर कधी मुसळधार पाऊस अशा बदलत्या हवामानाचा परिणाम रानभाज्यांच्या उपलब्धतेवर झाला आहे. त्यामुळे बाजारात आवक कमी असून दरही गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढले आहेत.

महागाईमुळे अनेक ग्राहकांना इच्छेनुसार रानभाज्यांची खरेदी करता येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. रानभाज्या आरोग्यासाठी पोषक आणि औषधी गुणधर्मांनी युक्त असल्याने पावसाळ्यात त्यांची विशेष मागणी असते. अनेक नागरिक बाजारात रानभाज्या पाहण्यासाठी येत असले तरी वाढलेल्या किमतीमुळे कमी प्रमाणात खरेदी करत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

## मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाच्या अध्यक्षपदी प्रकाश बाविस्कर

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्रातील विकासकांची शिखर संघटना असलेल्या मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाच्या राज्यस्तरीय संयुक्त बैठकीत सर्व संलग्न असोसिएशनच्या प्रतिनिधींच्या एकमताने प्रकाश भीमराव बाविस्कर यांची महासंघाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच प्रमोद पाटील यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली.

बैठकीत महासंघाच्या भविष्यातील संघटनात्मक विस्तार, राज्यव्यापी कार्ययोजना आणि बांधकाम उद्योगाच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. महासंघाच्या कार्याला शासन, उद्योग व विविध क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे या उद्देशाने आमदार प्रवीण दरेकर यांना महासंघाच्या संरक्षकपदाची, गजानन कीर्तिकर यांना प्रमुख मार्गदर्शकपदाची तसेच सतीश मगर यांना प्रमुख सल्लागारपदाची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच बांधकाम, उद्योग, कायदा, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचे मार्गदर्शन व सहकार्य घेऊन महासंघाची राज्यव्यापी संघटनात्मक उभारणी अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीस महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे, कार्याध्यक्ष संजय कुलकर्णी, उपाध्यक्ष अजित मराठे, उपाध्यक्ष गजेंद्र पवार, सहसचिव संदीप कोल्हटकर, खजिनदार बाबासाहेब भोसले, मुंबई, पुणे, नाशिक व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, विकासक, प्रतिनिधी उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाश बाविस्कर यांचे उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

नियुक्तीनंतर बोलताना प्रकाश बाविस्कर यांनी सांगितले की, मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाला महाराष्ट्रातील सर्वात सक्षम आणि प्रभावी राज्यस्तरीय शिखर संघटना म्हणून विकसित करण्यासाठी व्यापक संघटन विस्तार अभियान राबविण्यात येईल. यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात "मराठी बांधकाम व्यवसायिक असोसिएशन" स्थापन करण्यात येईल. त्यानंतर प्रत्येक तालुका, शहर आणि नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात शाखा उभारून विकासक, अभियंते, वास्तुविशारद, सल्लागार, कंत्राटदार, पुरवठादार आणि बांधकाम क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना एका सक्षम व्यासपीठावर एकत्र आणले जाईल.

## तानाजी नारनवर यांनी स्वीकारली वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाची सूत्रे

**पनवेल, कळंबोली : प्रतिनिधी**



कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून महाराष्ट्र पोलीस दलातील कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि अनुभवी अधिकारी तानाजी महादेव नारनवर यांनी पदभार स्वीकारला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी) पदावर बढती मिळाल्यानंतर राजेंद्र कोते यांनी पदभार नारनवर यांच्याकडे सुपूर्द केला.

तानाजी नारनवर यांनी आपल्या कारकिर्दीत कठोर व निष्पक्ष कार्यपद्धतीमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी रायगड जिल्हा विशेष शाखा, नागोठणे, वडखळ, सावंतवाडी तसेच रायगड नियंत्रण कक्ष अशा विविध ठिकाणी यशस्वीपणे जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. विशेषतः अवैध धंद्यांवर कारवाई, गंभीर गुन्ह्यांचा छडा लावणे आणि गुन्हेगारांवर प्रभावी अंकुश ठेवण्यात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

नागरिकांशी संवाद वाढविणे, पोलीस दलाविषयी विश्वास दृढ करणे आणि कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करणे, हे त्यांच्या कार्यशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना तानाजी नारनवर यांनी महिला व बाल सुरक्षा, अमली पदार्थ व अवैध धंद्यांवर कठोर कारवाई, संघटित गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण, तसेच नागरिकांना सुरक्षित व विश्वासार्ह वातावरण उपलब्ध करून देणे ही आपल्या कार्यकाळातील प्रमुख उद्दिष्टे असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या नियुक्तीमुळे कळंबोली आणि परिसरातील कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट होईल तसेच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण येईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## संपादकीय

# ठोस उपाययोजना आवश्यक

मुंबईतील चेंबूर परिसरात शाळेच्या व्हॅनवर झाड कोसळल्याने एका लहान विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि अनेक मुले जखमी झाली. शाळेत जाणाऱ्या निष्पाप विद्यार्थ्यांवर आलेले हे संकट संपूर्ण समाजाला अस्वस्थ करणारे आहे. या घटनेमुळे केवळ दुःख व्यक्त करून चालणार नाही, तर भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**मुंबईतील चेंबूर परिसरात शाळेच्या व्हॅनवर झाड कोसळल्याने एका विद्यार्थ्याचा मृत्यू आणि इतर काही विद्यार्थ्यांच्या जखमी होण्याची घटना अत्यंत वेदनादायक आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी सुरक्षित प्रवास ही किमान अपेक्षा असते. मात्र काही क्षणांत घडलेल्या या दुर्घटनेने अनेक कुटुंबांचे आयुष्य हादरवून सोडले. ही घटना केवळ अपघात नाही, तर शहरांच्या विकासाच्या मॉडेलवर आणि नागरी व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असली तरी शहरातील पायाभूत सुविधांवरील वाढता ताण, हवामानातील बदल आणि देखभालीतील त्रुटी यांचे असे परिणाम अधुनमधुन दिसून येत असतात. मान्सून सुरू होताच झाडे कोसळणे, रस्त्यांवर पाणी साचणे, इमारतींचे काही भाग ढासळणे अशा घटना घडत असतात. परंतु जेव्हा अशा घटनेत निष्पाप विद्यार्थ्यांचा बळी जातो, तेव्हा ती केवळ एक आकस्मिक दुर्घटना राहत नाही; ती प्रशासन, स्थानिक संस्था आणि नागरिकांच्या एकत्रित जबाबदारीची कसोटी ठरते. झाडे ही शहराची फुफ्फुसे मानली जातात. वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि काँक्रीटीकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरांमध्ये वृक्षसंवर्धन आवश्यक आहे. मात्र वृक्षसंवर्धन म्हणजे केवळ झाडे लावणे नव्हे. जुन्या, रोगट किंवा धोकादायक अवस्थेतील झाडांची नियमित तपासणी आणि आवश्यकतेनुसार छाटणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेकदा नागरिकांकडून संभाव्य धोकादायक झाडांबाबत तक्रारी केल्या जातात, पण त्यावर वेळेत कारवाई होत नाही. नागरिकांची भूमिकाही या संदर्भात तितकीच महत्त्वाची आहे. परिसरातील झाडे धोकादायक स्थितीत असल्याचे स्थानिक रहिवाशांच्या सर्वप्रथम लक्षात येते. अशा वेळी संबंधित महानगरपालिका किंवा वृक्ष प्राधिकरणाकडे त्वरित तक्रार नोंदवणे आवश्यक आहे. आज अनेक नागरी संस्थांकडे ऑनलाइन तक्रार प्रणाली उपलब्ध आहे. नागरिकांनी अशा सुविधांचा सक्रियपणे वापर करावा. तसेच झाडांच्या छाटणीसंदर्भातील कामांमध्ये अनावश्यक विरोध न करता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणेही गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली धोकादायक झाडांकडे दुर्लक्ष करणे हेही तितकेच चुकीचे ठरू शकते. शाळा, गृहनिर्माण संस्था आणि स्थानिक स्वयंसेवी संघटनांनीही मान्सूनपूर्व सुरक्षा मोहिमा राबविण्याची गरज आहे. परिसरातील झाडांचे निरीक्षण, संभाव्य धोके ओळखणे आणि त्याबाबत प्रशासनाला माहिती देणे यासाठी सामुदायिक सहभाग वाढविता येईल. सुरक्षित शहरांची निर्मिती ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती नागरिक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच शक्य होते. चेंबूरमधील घटनेच्या निमित्ताने महानगरपालिका, वृक्ष प्राधिकरण आणि संबंधित यंत्रणांनी शहरातील सर्व धोकादायक झाडांचे व्यापक सर्वेक्षण हाती घेण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने वृक्षांची आरोग्य तपासणी, त्यांच्या मुळांची स्थिती आणि संभाव्य धोके यांचे वैज्ञानिक मूल्यमापन केले जाऊ शकते. अशा उपाययोजनांमुळे दुर्घटनांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. गेल्या काही वर्षांत मुसळधार पाऊस, जोरदार वारे आणि अनियमित हवामानाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे पूर्वी सुरक्षित वाटणारी झाडेसुद्धा अचानक कोसळण्याची शक्यता निर्माण होते. अशा परिस्थितीत आपत्ती व्यवस्थापनाच्या धोरणांमध्ये वृक्षसुरक्षेलाही प्राधान्य देणे आवश्यक आहे.**

# पालखी सोहळा : अथ ते इथपर्यंतचा प्रवास



संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा इतिहास हा केवळ धार्मिक परंपरेचा इतिहास नाही, तर तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि लोकजीवनाचा चालता-बोलता दस्तऐवज आहे. आज लाखो वारकरी, शेकडो दिंड्या, डिजिटल नियंत्रण व्यवस्था, ड्रोन निरीक्षण, प्रशस्त चौपदरी रस्ते आणि अत्याधुनिक सुविधा यांसह दिसणारा पालखी सोहळा एकेकाळी अत्यंत साध्या, कष्टमय आणि खडतर पायी यात्रेच्या स्वरूपात अस्तित्वात होता. चिखलातून, नदी-नाल्यांतून, डोंगर-दऱ्यांतून आणि काटेरी पायवाटांवरून विठ्ठलाच्या भेटीस निघालेल्या या यात्रेने काळानुसार आधुनिकतेचा स्वीकार केला; पण तिच्या भक्तीचा आत्मा मात्र आजही तितकाच जिवंत आहे.

**संतकालीन वारी : भक्ती, साधेपणा आणि सामूहिकता**

संतांच्या काळात आजच्या अर्थाने "पालखी सोहळा" अशी औपचारिक संकल्पना अस्तित्वात नव्हती. वारकरी टाळ-मृदंग, वीणा, भगवी पताका आणि संतांच्या पादुका किंवा स्मृतीचिन्हांसह पायी पंढरपूरकडे प्रस्थान करत असत. गावोगावी मुक्काम, रात्री भजन-कीर्तन, पहाटे हरिनामाचा गजर आणि पुन्हा प्रवास एवढ्याच साधेपणात वारी वाहत होती. ना रथ, ना चोपदार, ना नियोजित मुक्काम, ना प्रशासकीय व्यवस्था. विठ्ठलनाम हाच आधार आणि सामूहिक भक्ती हीच ताकद होती.

संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनानंतर त्यांचे धाकटे चिरंजीव नारायण महाराज यांनी वारीची सूत्रे हाती घेतली. त्यांनी वारकऱ्यांचे संघटन करून वारीला अधिक नियमित आणि शिस्तबद्ध स्वरूप दिले. वारकरी परंपरेतील काही उल्लेखांनुसार, प्रारंभी काही काळ दोन्ही संतपरंपरांमध्ये एकात्म भावाने वारी केली जात असे. त्यामुळे "ज्ञानोबा-तुकोबा" हा संयुक्त गजर वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक एकात्मतेचे प्रतीक बनला.

**खडतर मार्ग, पावसाळी वाटा आणि जीवघेणा प्रवास**

आज जसे चौपदरी महामार्ग आणि प्रशस्त रस्ते आहेत तसे त्या काळात नव्हते. पालखी मार्ग हा मुख्यतः मातीचे रस्ते, जंगलातील पायवाटा, नदीकाठचे मार्ग आणि व्यापारी घोडेमार्ग यांवर आधारित होता. पावसाळ्यात नद्या दुथडी भरून वाहत आणि अनेकदा वारकऱ्यांना पाण्यातूनच मार्ग काढावा लागत असे. काही ठिकाणी होड्यांचा आधार घ्यावा लागे. दिवे घाट, जेजुरी परिसर आणि माळशिरसकडील अनेक टप्पे अत्यंत खडतर मानले जात.

देहूहून निघणारी वारी साधारण देहू पुणे हडपसर सासवड जेजुरी लोणंद फलटण परिसर माळशिरस वाखरी पंढरपूर या पट्ट्यातून जात असे आता ती

देहू, पिंपरी-चिंचवड, पुणे, हडपसर, लोणीकाळभोर, यवत, वरवंड, पाटस, उडंवडी गवळ्याची, बारामती, सणसर, निमगाव केतकी, इंदापूर, सराटी, आकलुज, बोरगाव, पिराची कुरोली, वाखरी-पंढरपूर अशी जाते ; तर आळंदीहून निघणारी माऊलींची वारी आळंदी पुणे दिवे घाट सासवड जेजुरी लोणंद तरडगाव नातेपुते माळशिरस वाखरी पंढरपूर या मार्गाने पुढे सरकत असे. मात्र हे मार्ग आजसारखे निश्चित नव्हते. पावसाचा जोर, नदीची स्थिती आणि सुरक्षितता लक्षात घेऊन मार्गात बदल होत असत.

**दोन परंपरा, एकच भक्तीभाव**

सुरुवातीच्या काळात वारी ही एकत्रित भक्ती परंपरा होती, मात्र पुढे देहूची संत तुकाराम महाराज पालखी आणि आळंदीची संत ज्ञानेश्वर महाराज पालखी अशा दोन स्वतंत्र परंपरा विकसित झाल्या. दोन्ही संतांचे धार्मिक केंद्र, अनुयायी, दिंड्या आणि मानकरी वेगळे होत गेले. त्यामुळे स्वतंत्र पालख्या, स्वतंत्र मुक्काम आणि स्वतंत्र शिस्त निर्माण झाली. तरीही "ज्ञानोबा-तुकोबा"चा गजर दोन्ही परंपरांच्या आध्यात्मिक ऐक्याचे प्रतीक म्हणून कायम राहिला.

**हैबतबाबा आरफाळकर आणि पालखी सोहळ्याचे संघटन**

पालखी सोहळ्याला संघटित, शिस्तबद्ध आणि सार्वजनिक स्वरूप देण्याचे मोठे श्रेय हैबतबाबा आरफाळकर यांना जाते. ग्वाल्हेरकर शिंद्यांच्या सैन्यात सरदार म्हणून काम केल्याने लष्करी शिस्त त्यांच्या अंगी भिनली होती. त्यांनी तीच शिस्त वारीत उतरवली.

पालखी सोहळ्याची रथ, दिंडी, चोपदार आणि मानव्यवस्थेसह अधिक संघटित पुनर्रचना करण्यात आली. दिंड्यांना क्रमांक देण्यात आले, मुक्काम आणि प्रस्थानाच्या वेळा निश्चित करण्यात आल्या. चोपदार, नगारखाना, अश्व, ध्वज आणि शामियाने यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे वारी एका साध्या भक्ती यात्रेतून शिस्तबद्ध लोकसोहळ्यात रूपांतरित झाली.

विविध सरदार, संस्थानिक आणि जहागीरदारांनी धान्य, घोडे, तंबू आणि आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. आजही पालखीतील अनेक मानपरंपरा त्या इतिहासाच्या जिवंत साक्षी मानल्या जातात.

**महाराष्ट्र शासनाचा वाढता सहभाग**

दीर्घकाळ वारीचे व्यवस्थापन हे स्थानिक गावकरी, मानकरी, दिंडीप्रमुख आणि वारकरी परंपरेच्या सामूहिक शिस्तीवर आधारित होते. पूर्वीपासून काही प्रमाणात प्रशासकीय मदत असली तरी १९९० च्या दशकानंतर शासनाचा सहभाग अधिक औपचारिक आणि व्यापक झाला. "निर्मल वारी"सारख्या स्वच्छता मोहिमा, आरोग्य सुविधा आणि वाहतूक नियंत्रण यांमधून शासनाची भूमिका अधिक स्पष्ट झाली. त्यानंतर पालखी मार्गांचा विकास, मूलभूत सुविधा, मुक्काम व्यवस्थापन आणि समन्वित नियोजन या कामांना अधिक गती मिळाली.

वारीच्या यशस्वी आयोजनासाठी शासनाकडून पालखी मार्गांची दुरुस्ती, तात्पुरते रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पालखी तळांवर निवाऱ्याची सोय केली जाऊ लागली. आरोग्य विभागामार्फत फिरते दवाखाने, रुग्णवाहिका, आरोग्यदूत आणि वैद्यकीय पथके तैनात करण्यात येऊ लागली. "निर्मल वारी" अभियानांतर्गत स्वच्छतेसाठी विशेष निधी आणि मनुष्यबळाची तरतूद करण्यात आली; तर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि वाहतूक नियंत्रणासाठी मोठा पोलीस बंदोबस्त उभा राहू लागला.

अलीकडील काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालखी नियोजनासंदर्भात विशेष बैठका घेऊन प्रशासनाला आवश्यक सुविधा आणि समन्वयाबाबत निर्देश दिले. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही पालखी व्यवस्थापनासंदर्भात संयुक्त बैठका घेऊन विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यावर भर दिला.

**प्रशासन, तंत्रज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन**

आजचा पालखी सोहळा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्रशासकीय व्यवस्थापनांपैकी एक मानला जातो. लाखो वारकरी सुमारे तीन आठवडे पायी चालत असताना संपूर्ण प्रशासन त्यांच्या सेवेसाठी कार्यरत असते. जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायती, महापालिका, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, वीज वितरण कंपन्या आणि स्वयंसेवी संस्था यांचा मोठा समन्वय या काळात पाहायला मिळतो.

वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मोबाइल शौचालये, आरोग्य तपासणी शिबिरे, रुग्णवाहिका, हरवलेल्यांसाठी नियंत्रण कक्ष, स्वच्छता मोहीम, वाहतूक नियंत्रण आणि मुक्काम व्यवस्था मोठ्या प्रमाणावर केली जाते. आता वारीत ड्रोन निरीक्षण, सीसीटीव्ही, डिजिटल कमांड सेंटर आणि जीपीएस आधारित नियंत्रण व्यवस्थेचाही वापर होतो. लाखो लोकांचा हा प्रवास कोणताही मोठा अनुशासनभंग न होता पूर्ण होतो, हे प्रशासन आणि वारकरी शिस्त यांच्या अद्वितीय समन्वयाचे उदाहरण मानले जाते.

**केंद्र आणि राज्य शासनाच्या पुढाकारातून कायापालट**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालखी मार्गाच्या विकासासाठी विशेष लक्ष दिल्यानंतर ऐतिहासिक वारीला आधुनिक पायाभूत सुविधांची नवी जोड मिळाली. वाढती वाहतूक, वारकऱ्यांची वाढती संख्या आणि सुरक्षिततेच्या गरजा लक्षात घेऊन पालखी मार्ग अधिक सुरक्षित, रुंद आणि सुसज्ज करण्याची कामे वेगाने सुरू झाली.

पुणे ते पंढरपूर या मार्गावर रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, सेवा रस्ते, वाहतूक नियंत्रण व्यवस्था आणि काही ठिकाणी वारकऱ्यांसाठी संरक्षित पदयात्रा मार्ग उभारण्यावर भर देण्यात आला. पालखी मार्ग हा केवळ धार्मिक प्रवासाचा रस्ता नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनवाहिनीचा भाग आहे, या दृष्टीने केंद्र आणि राज्य शासनाने त्याच्या विकासाकडे पाहण्यास सुरुवात केली.

**-युवराज पाटील,**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**



## बदलते तंत्रज्ञान

# कंपन्यांना द्यावा लागणार एकसमान चार्जिंग पोर्ट



अनेक फोनला वेगवेगळ्या प्रकारचे चार्जर आणि पिन असलेल्या चार्जिंग केबल्स लागतात. आता ही कटकट कायमची मिटणार आहे. सरकारने सर्व नव्या स्मार्ट फोन्स आणि टॅबलेटसाठी एकसारखे पिन असलेली चार्जिंग केबल पुरविण्याचे बंधनकारक केले आहे. त्यानुसार 'यूएसबी-सी' प्रकारच्या चार्जिंग पोर्टला जोडता येईल, अशा केबल्स पुरवाव्या लागणार आहेत. पुढील वर्षी जून महिन्यापासून याची अंमलबजावणी करण्यात येईल, असे सूत्रांनी सांगितले आहे.

काही ब्रँडसाठी वेगळ्या प्रकारचे चार्जिंग पोर्ट आणि केबल्स लागतात. त्यांचा त्रास आता कमी होणार आहे. केंद्रीय आयटी मंत्रालय येत्या काही आठवड्यांत यासंदर्भात स्मार्ट फोन उत्पादक कंपन्यांना निर्देश देऊ शकते. समान चार्जिंग पोर्टच्या सक्तीतून बेसिक किंवा साधे फोन, वेअरेबल्स जसे की स्मार्ट वॉच यांसारखी उपकरणे वगळण्यात आली आहेत.

**युरोपमध्ये झाली अंमलबजावणी**

युरोपियन युनियनने वर्ष २०२२ मध्ये विविध उपकरणांसाठी एकसमान चार्जर आणि चार्जिंग केबलची अंमलबजावणी सुरू केली. यामुळे खर्चही कमी होतो; तसेच वाढत्या इलेक्ट्रॅनिक कचऱ्यावरही आळा घालता येतो.

**लॅपटॉपसाठी अंमलबजावणी कधी?**

* स्मार्ट फोन्स आणि टॅबलेटसाठी २०२५पासून नवे नियम लागू होऊ शकतात, तर लॅपटॉपसाठी याची अंमलबजावणी २०२६पासून होईल.

* भारताने युरोपियन स्टँडर्डस् स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, यासाठी अतिरिक्त सहा महिन्यांचा वेळ सर्व उत्पादकांना देण्यात येईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

५ अब्ज : मोबाइल फोन ई-कचऱ्यात २०२२मध्ये गेले, असा अंदाज आहे. ४१ दशलक्ष : टन एवढा ई-कचरा मोबाइलद्वारे दरवर्षी निर्माण होतो. १६ टक्के : ई-कचरा रिसायकल केला जातो. १० टक्के : ई-कचरा हा मोबाईल फोनशी संबंधित आहे. भारत आणि चीनमध्ये वापरलेल्या फोनची सर्वांत मोठी बाजारपेठ आहे.

**सी-टाइप पोर्टचे फायदे काय?**

फास्ट चार्जिंग आणि डेटा ट्रान्सफरसाठी सी-टाइप पोर्ट अतिशय उपयुक्त आहे. १९९६पासून या पोर्टचा वापर होत आहे. २०००मध्ये मायक्रो यूएसबी पोर्टचा वापर सुरू झाला. सी-टाइपमध्ये २४ पिन असतात. कोणत्याही बाजूने केबल वापरता येते. यामुळे ई-कचरा कमी करण्यास मदत होईल.

# डॉक्टर्स डे इतिहास आणि महत्त्व

एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याच्या सुरुवातीपासून त्याच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक टप्प्यावर डॉक्टर त्याच्यासोबत असतो. मूल जन्माला आले की आईच्या पोटातून बाळाला जगात आणणारा डॉक्टरच असतो. त्यानंतर बाळाला रोगांपासून वाचवण्यासाठी आणि निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि लसीकरण इत्यादीची जबाबदारी डॉक्टरांची आहे. जसजसे मूल वाढते तसतसे त्याच्या शरीरात बदल सुरू होतात. या सर्व बदलांचा, समाजाचा आणि जीवनशैलीचा मानवी आरोग्यावर परिणाम होत असतो. शारीरिक, मानसिक समस्यांनी ग्रासलेल्या व्यक्तीच्या सर्व वेदना आणि रोग केवळ एक डॉक्टरच बरे करतो. त्यामुळे भारतात डॉक्टरांना देवाचा दर्जा दिला जातो. डॉक्टरांच्या या सेवाभावनेचा, जीव वाचवण्यासाठी केलेले प्रयत्न आणि त्यांचे कार्य यांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी जुलैला राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा केला जातो. डॉक्टरांचे आभार मानण्याचा हा दिवस आहे. पण डॉक्टर्स डे कधी साजरा केला जातो हे तुम्हाला माहीत आहे का? राष्ट्रीय डॉक्टर्स डे साजरा का सुरू झाला? प्रथमच डॉक्टर्स डे का आणि कसा साजरा करण्यात आला? राष्ट्रीय डॉक्टर्स डे साजरा करण्याचे कारण, इतिहास जाणून घ्या.



**निमित्त**

दरवर्षी १ जुलै हा दिवस डॉक्टर्स डे म्हणजेच राष्ट्रीय डॉक्टर दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सर्व लोक, ज्यांचे आयुष्य एका किंवा दुसऱ्या डॉक्टरांशी जोडलेले आहे, ते डॉक्टरांचे आभार मानतात. त्याला या जगात आणण्यासाठी आणि त्याला निरोगी ठेवण्यासाठी डॉक्टरांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्याचे आभार मानले जातात.

भारतात प्रथमच १९९१ साली राष्ट्रीय डॉक्टर्स डे साजरा करण्यास सुरुवात झाली. या वर्षी केंद्र सरकारने प्रथमच डॉक्टर्स डे साजरा केला. डॉक्टरांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्याची सुरुवात झाली. त्यांचे नाव होते डॉ. बिधान चंद्र रॉय.

वास्तविक डॉ.बिधानचंद्र राय हे बंगालचे माजी मुख्यमंत्री आहेत. ते एक वैद्य देखील होते, ज्यांचे वैद्यकीय क्षेत्रात मोठे योगदान होते. जाधवपूर टीबी मेडिकल इन्स्टिट्यूटच्या स्थापनेत डॉ. बिधानचंद्र रॉय यांचा मोलाचा वाटा होता. ते भारताच्या उपखंडातील पहिले वैद्यकीय सल्लागार म्हणून प्रसिद्ध झाले. ४ फेब्रुवारी १९६१ रोजी डॉ.बिधानचंद्र रॉय यांनाही भारतरत्न प्रदान करण्यात आला होता. मानवतेच्या सेवेतील अभूतपूर्व योगदानाची दखल घेण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्यास सुरुवात केली.

१ जुलैला डॉक्टर्स डे साजरा करण्यामागे एक खास कारणही आहे. थोर वैद्य डॉ.बिधानचंद्र रॉय यांचा जन्म १ जुलै १८८२ रोजी झाला. एवढेच नाही तर १ जुलै १९६२ रोजी डॉ.बिधानचंद्र रॉय यांचे निधन झाले. या कारणास्तव त्यांच्या जयंती व पुण्यतिथीच्या दिवशी त्यांच्या स्मरणार्थ प्रत्येक डॉक्टरांचा सन्मान करण्यासाठी १ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या, कसा असावा वर्षा ऋतूमधील आहार

पावसाळ्यामध्ये पाणी साचल्यामुळे डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पिरोसिस, पोटाचे विकार इत्यादी आजार होऊ शकतात. म्हणूनच पावसाळ्यात आहारावर विशेष लक्ष देणे आवश्यक असते. जाणून घेऊया पावसाळ्यात आरोग्याची काळजी कशी घ्यावी...



**पाणी :** पावसाळ्यात पाणी उकळून प्यावे, कारण नदी, नाले विहिरी, तळी यांच्यात येणारे पाणी बऱ्याच घाणीतून प्रवास करून येत असते, पण बऱ्याच जणांना उकळलेल्या पाण्याची चव आवडत नाही. आजकाल सर्वांच्या घरी फिल्टर किंवा आरओ (Reverse Osmosis)चे मशीन असते, परंतु ज्यांना ते शक्य नाही त्यांनी पावसाळ्याच्या वेळी नगरपलिकेकडून क्लोरिनच्या गोळ्या/थेंब मिळतात, जे प्यायच्या पाण्यात टाकल्याने पाणी शुद्ध होण्यास मदत होते.

**पाण्यात सुंठेचा तुकडा वापरावा :** विकत मिळणाऱ्या पाण्याच्या बाटल्या चांगल्या असतात, परंतु हल्ली तिथेही कधी कधी भेसळ असते. पावसाळ्यातील नवे पाणी बाधते. लोकांना सर्दी-पडसे याचा त्रास होत राहतो. तो टाळण्यासाठी म्हणून पाण्यात सुंठेचा एक तुकडा घालावा, तो दर तीन-चार दिवसांनी बदलावा.

**अन्न :** पावसाळ्यात पचायला हलका व प्रमाणशीर असाच आहार असावा. अधिक प्रमाणात घेतलेला आहार जो पचायला कितीही हलका असला तरी अयोग्यच! पचायला हलका आहार म्हणजे अग्निसंस्कार केलेला लाह्या, भाकरी, चपाती, दूध-भात, पिठले असा आहार. नुसत्या पावापेक्षा त्याचा टोस्ट बनवून खावा.

**माफक तेल :** माफक तेल वात कमी करणारे, तर साजुक तूप, वात व पित्त दोन्ही कमी करणारे आहे. पावसाळ्यात वात व पित्त दोन्ही वाढलेले असते. म्हणून जमल्यास अन्नपदार्थ साजुक तुपात करावेत, वनस्पती तुपात नव्हे! तेलात तळलेले पदार्थ या दिवसात खाऊ नयेत.

**दही टाळावे, ताक वापरावे :** या ऋतूत दही कमी खावे. दह्यामुळे शरीरातील अग्नी मंदावतो, पण ताक याच्याविरुद्ध गुणधर्माचे आहे. म्हणून या दिवसात ताक प्यावे.

**जुनी धान्ये उत्तम :** जुने धान्य पचावयास हलके असते. त्यामुळे या ऋतूत जुने गहू, जुने तांदूळ, जुनी धान्ये (मूग, मटकी, चवळी) वापरावीत.

**मांस टाळा, सूप प्या :** मांसाहारी व्यक्तीने मांस खाण्यापेक्षा त्याचे सूप करून प्यावे. यातही सुंठ, मिरी, पुदीना इ. चा सढळ हाताने वापर करावा.

# मोरबेत फक्त नऊ टक्के पाणी

## नवी मुंबईत १० टक्के कपात, टँकरने मिळणार प्रक्रिया केलेले पाणी

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय हवामान विभागाने अल-निनोच्या प्रभावामुळे जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील नैऋत्य मान्सून पावसाचा दीर्घकालीन अंदाज प्रसिद्ध केला आहे. या अंदाजानुसार देशातील हंगामी पर्जन्यमान हे दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी होणार आहे. त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती व त्यावरील उपाययोजना याबाबत नागरिकांना अवगत केले होते. त्यास अनुसरून आयुक्तांनी पाणी बचतीबाबत पाणी पुरवठा विभागाने अंमलबजावणी केलेल्या उपाययोजनांचा रविवारी (दि. २८) सविस्तर आढावा घेतला.



याप्रसंगी अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) शंकर जाधव तसेच पाणीपुरवठा विभागातील सर्व उपअभियंता, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता आणि सर्व विभागांतील सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्ती कंत्राटदार उपस्थित होते. सद्यस्थितीत २८ जूनपर्यंत मोरबे धरणामध्ये केवळ १७.८६३ द.ल.घ.मी. (९.३६ टक्के) इतके पिण्यायोग्य पाणी शिल्लक आहे. सदर उपलब्ध जलसाठा किमान ३१ ऑगस्टपर्यंत पुरविणे व पुढील वर्षीच्या ऑगस्ट २०२७ पर्यंत उद्भवणारी पाणीटंचाई लक्षात घेऊन नवी मुंबई शहरातील उपलब्ध जलसाठ्याचा काटेकोर, शाश्वत व कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत यापूर्वीच करण्यात आलेली १० टक्के पाणीकपात व दैनंदिन पाणी वापरामुळे मोरबे धरणातील जलसाठ्याचे सातत्याने कमी होणारे प्रमाण या अनुषंगाने पाणीपुरवठ्याच्या नियोजनाबाबत व प्रभावी उपाययोजनांबाबत चर्चा करीत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महत्त्वपूर्ण निर्देश दिले. गृहनिर्माण संस्थेतील सर्व पदाधिकारी, नागरिक यांना पाणी बचतीबाबत व मोरबे धरणातील उपलब्ध जलसाठ्याबाबत नियमितपणे अवगत करावे. पाणीपुरवठ्याबाबत विभाग स्तरावर स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन तातडीने सूक्ष्म जलनियोजन कृती आराखडा तयार करावा. गृहनिर्माण संस्थेतील पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी जलतरण तलाव, बागा तसेच वाहन धुणे इ. करिता पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तत्काळ बंद झाला आहे याची तपासणी करून खातरजमा करावी. शहरातील सर्व विहिरी व बोअरवेल्स यांची तातडीने पुढील पाच दिवसांत सलग स्वच्छता करून त्यांचे पुनरुज्जीवन करावे.

आवश्यकतेनुसार आर.ओ. प्रणाली व सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी कार्यक्षम पंपिंग प्रणाली कार्यान्वित करावी. व्यावसायिक व वाणिज्यिक ग्राहकांना यापूर्वीच २०% पाणीकपात करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तपासणी करून उल्लंघन केल्यास नोटीस व दंडात्मक कारवाई करावी. अनधिकृत पाणी वापराची तक्रार संबंधित विभाग कार्यालयातील पाणीपुरवठा विभागाकडे अथवा टोल फ्री क्रमांक १८००२२२३०९ यावर करावी. सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे ५२.५० द.ल.लि. इतके तृतीय स्तरीय प्रक्रियाकृत सांडपाणी उपलब्ध आहे. या पाण्याचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी सर्व विभागनिहाय कृती आराखडा तयार करावा. प्रत्येक विभाग कार्यालय क्षेत्रात टँकरद्वारे प्रक्रियाकृत सांडपाणी पुरवठा करण्यासाठी टँकर फिलिंग पॉइंट्स विकसित करावेत. हे पाणी सर्व बांधकामधारक तसेच मोठ्या गृहनिर्माण संस्थेतील उद्याने यांना आवश्यकतेनुसार त्यांच्या स्वतःच्या वाहनाद्वारे, टँकरद्वारे उपलब्ध करून दिले जाईल. महानगरपालिकेमार्फत सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांसाठी तृतीयस्तरीय प्रक्रियाकृत सांडपाणी, पुनरुज्जीवित विहिरींमधील अथवा बोअरवेल्समधील पाण्याचा १०० टक्के वापर करावा.

नागरिक, गृहनिर्माण संस्था, उद्योगांनी पाण्याचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# नवी मुंबईत अतिक्रमणांवर हातोडा

## सेक्टर २९, करावे गावातील बांधकामे जमीनदोस्त



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपआयुक्त डॉ. अमोल पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

शंकर पौश्या माळी घर क्र. ८२५, आग्रोळी गाव, आयटीआयच्या बाजूला सेक्टर-२९ बेलापूर तसेच संपुर्णा सिद्धार्थ भोईर व इतर बांधकामधारक घर क्र. ००९३/००३ नवी मुंबई महानगरपालिका शाळेच्या मागे से.३६ करावे गाव नवी मुंबई यांना नोटीस बजावण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संबंधितांनी अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामावर ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत २५ जून रोजी तोडक मोहिमेचे आयोजन करून सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे.

या धडक मोहिमेसाठी ए विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी प्रशांत नेरकर, सहा. अभियंता आत्माराम काळे व विभागातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सदर मोहिमेसाठी १५ मजूर, एक गॅसकटर, पाच हॅमर, एक जेसीबी इत्यादी मनुष्यबळ व साधनसामुग्री वापरण्यात आली. तसेच स्थानिक पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी व अतिक्रमण विभागातील पोलीस अधिकारी-कर्मचारी व सुरक्षारक्षक उपस्थित होते.



## वाशी विभागात अनधिकृत बांधकामावर निष्कासन कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपआयुक्त (अनधिकृत बांधकामे नियंत्रण विभाग) डॉ. अमोल पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने वाशी विभागात अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई केली.

जुहूगाव परिसरात सदानंद पाटील (मयत)/बाळा पाटील, घर नं. ४८०, जुहूगाव, वाशी, यांना महाराष्ट्र प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम १९६६चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात येऊन २७ जूनला सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. अधिकारी-कर्मचारी, अतिक्रमण पोलीस, सुरक्षा रक्षक, मजूर, आदींच्या सहाय्याने अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

# नवी मुंबईत पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत असणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस निरीक्षकांच्या पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशानुसार बदल्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२/२ मधील सुधारित स्पष्टीकरणानुसार अपवादात्मक प्रकरणांमध्ये जनहितार्थ आणि प्रशासनिक निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस आस्थापना मंडळ (पोलीस आयुक्त स्तरावरील) पोलीस आयुक्तांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवरील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याची माहिती पोलीस कार्यालयातून देण्यात आली.

पोलीस आयुक्त भारंबे यांच्या आदेशानुसार सानपाडा पोलीस ठाण्यातील (प्रभारी अधिकारी) वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास कठाळे यांची रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. त्याचबरोबर दीपक सुर्वे वपोनि न्हावाशेवा यांची सानपाडा पोलीस ठाणे, रबाळे पोलीस ठाण्याचे प्रभारी सुनील वाघमारे यांची एन.आर.आय. पोलीस ठाणे, खारघर (सायबर) पोलीस निरीक्षक दीपाली पाटील यांची विमानतळ पोलीस ठाणे, खारघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरज पाटील यांची न्हावाशेवा पोलीस ठाणे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांची उरण पोलीस स्टेशनचे प्रभारी, गुन्हे शाखेच्या ज्योती देशमुख यांची कामोठे पोलीस स्टेशन, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांची पनवेल शहर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तुर्भे पोलीस ठाण्याचे गजानन कदम यांची मानवी वाहतूक प्रतिबंधक विभाग तर गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांची वाहतूक शाखेत बदली करण्यात आली आहे.

# नेरूळ विभागात संयुक्तिक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका व सिडको अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागाकडून २५ जून रोजी नेरूळ नोड येथे संयुक्त निष्कासन मोहीम राबवून सिडको अधिसूचित जागेवरील नेरूळ सेक्टर ६ GES भूखंड क्र. १७० ते १७४ मौजे सारसोळे सर्वे नंबर ४८ येथील RCC (G+१) (अंदाजे क्षेत्रफळ ६०० चौ. मी.) चे अनधिकृत बांधकाम पोकलेनच्या सहाय्याने तोडले.



अतिक्रमण नवी मुंबई महानगरपालिकाच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून व नवी मुंबई महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले असल्यामुळे सदर बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये ९ जानेवारी २०२६ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. तरी सदर नोटीसीला न जुमानता अनधिकृत बांधकाम केल्याने २५ जून रोजी आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपआयुक्त (अतिक्रमण) डॉ. अमोल पालवे नवी मुंबई महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली बी विभाग नेरुळ सहा. आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका व अतिक्रमण विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) सिडको यांच्या समन्वयाने संयुक्तिक कारवाई यशस्वीपणे राबविण्यात आली. सदर कारवाई १७ मजूर, दोन पोकलेन, एका जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षा रक्षक यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

# उरणमध्ये एकाच दिवशी दोन अज्ञात व्यक्तींचे मृतदेह

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात शनिवारी अवघ्या काही तासांच्या अंतराने दोन वेगवेगळ्या ठिकाणी अज्ञात व्यक्तींचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पहिली घटना दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास उरण रेल्वे स्थानकाबाहेर उरण-पनवेल मार्गालगत साचलेल्या पाण्यात घडली. स्थानिक नागरिकाला एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह दिसून आल्यानंतर त्यांनी तात्काळ उरण पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर उरण पोलीस व सिडको अग्निशमन दलाच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून पुढील तपासासाठी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला. मृत व्यक्तीने टी-शर्ट आणि निळ्या रंगाची पँट परिधान केली होती.

यानंतर अवघ्या तासाभरात दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास न्हावा शेवा पोलीस ठाण्याजवळील जेडब्ल्यू कंपनीच्या कंपाउंडबाहेरील नाल्यात आणखी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. माहिती मिळताच न्हावा शेवा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून पुढील तपासासाठी पाठविण्यात आला.एकाच दिवशी उरण तालुक्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी अज्ञात व्यक्तींचे मृतदेह आढळल्याने नागरिकांमध्ये भीती आणि खळबळ निर्माण झाली आहे. दोन्ही मृतांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असून कोणाची व्यक्ती बेपत्ता असल्यास त्यांनी तत्काळ उरण पोलीस ठाणे आणि न्हावा शेवा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# वाढवण बंदरासाठी स्थानिकांना रोजगार

## कौशल्य विकासाला व्हीपीपीएलकडून वेग

**उरण : वार्ताहर**

भारतातील १३वे प्रमुख बंदर असलेल्या वाढवण बंदर प्रकल्पासाठी स्थानिक युवकांना उद्योगाभिमुख कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला अधिक गती देण्यासाठी वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल)तर्फे आज उच्चस्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत आतापर्यंत झालेल्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच प्रकल्पाच्या विविध टप्प्यांपूर्वीच स्थानिक युवकांना उद्योगाच्या गरजांनुसार आवश्यक कौशल्ये प्राप्त करून देण्यासाठी विविध महत्त्वाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा (भा.प्र.से.), वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल (भा.प्र.से.), महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे आयुक्त, कौशल्य विकास तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी (भा.प्र.से.), पालघर जिल्हाधिकारी इंदूराणी जाखर (भा.प्र.से.), वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवीश कुमार सिंह (भा.रे.वा.से.) तसेच व्हीपीपीएल, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (डीव्हीईटी), महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीतील प्रमुख आकर्षण म्हणजे 'मनुष्यबळ प्रक्षेपण अभ्यास अहवाल' सादर करण्यात आला.



वाढवण बंदर प्रकल्पाच्या विविध टप्प्यांनुसार भविष्यातील मनुष्यबळाची गरज, उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी, आवश्यक तांत्रिक कौशल्ये आणि विविध पदांची आवश्यकता यांचा सविस्तर अभ्यास या अहवालात मांडण्यात आला आहे. तसेच, प्रकल्पाच्या कालबद्ध अंमलबजावणीशी मनुष्यबळाच्या मागणीची सांगड घालणारा हा अहवाल कौशल्य विकासाचे नियोजन, प्रशिक्षण कार्यक्रमांची वेळेवर अंमलबजावणी आणि आवश्यक क्षमताविकासासाठी दिशादर्शक ठरणार आहे.यावेळी बोलताना महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा (भा.प्र.से.) यांनी सांगितले की, राज्य शासन उद्योग क्षेत्राच्या बदलत्या गरजांनुसार सक्षम, प्रतिसादक्षम आणि भविष्योन्मुख कौशल्य विकास व्यवस्था उभारण्यासाठी कटिबद्ध आहे. वाढवण बंदरासाठी राबविण्यात येत असलेला हा कौशल्य विकास कार्यक्रम उद्योगाभिमुख प्रशिक्षणाला चालना देत राज्यातील युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

याप्रसंगी वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल (भा.प्र.से.) यांनी सांगितले की, व्हीपीपीएल, महाराष्ट्र शासन आणि उद्योग क्षेत्रातील भागीदार यांच्या संयुक्त सहकार्यामुळे प्रकल्पाच्या गरजांनुसार कुशल मनुष्यबळाची सक्षम साखळी विकसित होईल. यामुळे स्थानिक युवकांना वाढवण बंदराच्या उभारणीसह त्याच्या दीर्घकालीन संचालनासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करून गुणवत्तापूर्ण रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.बैठकीदरम्यान व्हीपीपीएल आणि महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत कार्यरत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. या सहकार्याअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) वणगाव आणि आयटीआय पालघर येथे एकूण चार प्रशिक्षण तुकड्यांना प्रारंभ झाला आहे. आयटीआय वणगाव येथे फिटर फॅब्रिकेशन, डिजिटल मित्र आणि असिस्टंट इलेक्ट्रिशियन या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले असून, आयटीआय पालघर येथे मॅन्युअल मेटल आर्क वेल्डिंग या विशेष अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जात आहे. प्रत्येक प्रशिक्षण तुकडीत ३० प्रशिक्षणार्थी सहभागी असून, या उपक्रमाद्वारे स्थानिक युवकांना उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत २४ प्रिशिक्षण अभ्यासक्रमांद्वारे ७०००हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून उपक्रमाची यशस्वी वाटचाल सुरूच आहे.

# वटपौर्णिमेनिमित्त महिलांमध्ये हिवताप, डेंग्यूबाबत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप, डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्राअंतर्गत पावसाळा कालावधीत प्रत्येक गुरुवारी विशेष हिवताप, डेंग्यू जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप, डेंग्यू व साथरोगाबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात येत आहे.



४ जून ते २५ जून या कालावधीत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १०४ ठिकाणी जाहीर शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरांकरिता ३६ हजार ३०० नागरिकांनी भेट दिली असून १७१८ रक्तनमुने घेण्यात आले. यामध्ये २५ जून रोजी आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सभापती डॉ. जयाजी नाथ व संपूर्ण आरोग्य समिती पथकाने सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली येथे आयोजित शिबिराच्या ठिकाणी भेट दिली.

त्याचप्रमाणे २९ जूनला वटपौर्णिमेचे औचित्य साधून महिलांमध्ये विशेष जनजागृती करण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिवताप, डेंगी आजाराबाबत जनजागृती करण्यात आली असून एकूण २५ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण १० हजार ४४२ महिलांनी, नागरिकांनी लाभ घेतला असून एकूण १५३ रक्त नमुने घेण्यात आले आहेत. सदर शिबिरांचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून तसेच नागरिकांना डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करून कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टिक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे, घर व परिसर स्वच्छता ठेवणे, पाणी उकळून पिणे, भाजीपाला स्वच्छ धुवून वापरणे, उघड्यावरचे अन्न खाणे टाळणे याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

पावसाळ्यात घरात, घराभोवताली भंगार साहित्यामध्ये पाणी साचून ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्ती होते. यास्तव घरांतर्गत ड्रम, कुंड्यांच्या खालील प्लेटमधील पाणी अशा डासउत्पत्ती स्थानांची तपासणी करण्यात येते.

# शिक्षण प्रसारक विद्यालयात वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

एन.आर.बी. एज्युकेशनल सोशल अँड कल्चरल ट्रस्ट संचालित शिक्षण प्रसारक विद्यालय माध्यमिक या शाळेत सोमवारी (दि. २९) 'एक पेड माँ के नाम' या शासकीय उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाचे औचित्य साधून संस्थेचे अध्यक्ष नामदेव भगत यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. ते म्हणाले, "वृक्ष हे आपल्या जीवनभरात सतत देण्याचेच काम करत असतात. विद्यार्थ्यांनीदेखील वृक्षांकडून हाच गुण घेऊन आपल्या आयुष्यात सतत देण्याची आणि समाजातील गरजू घटकांना मदत करण्याची प्रवृत्ती जोपासावी." विद्यालयाचे मुख्याध्यापक शेखर जगताप यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. "वृक्ष केवळ सावली, फळे, फुले आणि अन्नपदार्थच देतात असे नाही, तर वातावरणातील घातक कार्बन डायऑक्साईड शोषून आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन देतात. म्हणूनच प्रत्येकाने वृक्ष लागवड आणि त्यांचे संगोपन केले पाहिजे," असा संदेश त्यांनी दिला.

यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः आणलेल्या विविध उपयोगी रोपांचे विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण केले. कार्यक्रमाला रंजना साळुंके, भाऊसाहेब आव्हाड, पूर्वा ठाकरे, मनीषा गावंड, विद्या पाटील यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# श्रीवर्धनच्या मध्यवर्तीय प्रशासकीय भवनात पार्किंगची सेवा केव्हा उपलब्ध होणार?

**श्रीवर्धन : बातमीदार**

काही वर्षांपूर्वी श्रीवर्धनचे तहसील कार्यालय श्रीवर्धन बाजारपेठेत अत्यंत अपुऱ्या जागेत होते. सदरची ब्रिटिशकालीन इमारत अत्यंत जीर्ण झालेली असल्याने श्रीवर्धनचे माजी आमदार व तत्कालीन अर्थमंत्री सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन शहरात सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी असावीत या उद्देशाने मध्यवर्तीय प्रशासकीय भवनाची निर्मिती करण्याचे ठरविले. त्यानुसार श्रीवर्धन सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयाच्या बाजूला असलेल्या जागेमध्ये भले मोठे असे मध्यवर्तीय प्रशासकीय भवन उभारण्यात आले. या ठिकाणी श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी कार्यालय, (प्रांत कार्यालय) श्रीवर्धन तहसील कार्यालय, उपनिबंधक कार्यालय,



तलाठी कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय व कृषी विभागाचे कार्यालय कार्यरत आहे.तसेच या इमारतीच्या बाजुला भूमिअभिलेख कार्यालय सुध्दा आहे.

सदर इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर अनेक शासकीय कार्यालय या इमारतीत आली. परंतु पहिल्याच पावसाळ्यामध्ये सदरची इमारत गळू लागल्याने या इमारतीवरती पत्र्याचे छप्पर ठोकण्यात आले. सदर मध्यवर्ती प्रशासकीय भवनाच्या इमारतीसमोर पार्किंगसाठी खूप मोठी अशी जागा उपलब्ध आहे. परंतु त्या ठिकाणी नागरिकांसाठी एक शेड तयार करून पार्किंगची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे.

कारण येणाऱ्या अधिकाऱ्यांची वाहने उभी करण्यासाठी जागा असून सुद्धा अधिकाऱ्यांना गाडीतून उतरून कार्यालयात जावे लागते. चालकांना मध्ये उभे असलेली दुचाकी वाहने बाजूला करून नंतर पार्किंग मध्ये वाहने उभी करता येतात. तसेच या इमारतीमध्ये स्वच्छतेचा प्रश्नही नेहमीच ऐरणीवर आलेला पाहायला मिळतो.

सदर मध्यवर्तीय प्रशासकीय भवनाच्या परिसरात नागरिकांची नेहमीच मोठ्या प्रमाणात गर्दी असते. या ठिकाणची स्वच्छतागृहे नेहमीच अस्वच्छ असल्याचे पाहायला मिळते. तसेच इमारतीच्या परिसरात देखील अनेक भाग धुळीने किंवा अन्य कचऱ्याने अस्वच्छ असल्याचे पाहायला मिळते. तरी प्रशासकीय भवनातील संबंधित अधिकाऱ्यांनी या ठिकाणी कंत्राटी पद्धतीने स्वच्छकाची नेमणूक करून या ठिकाणाचे नियमित स्वच्छता होईल व येणाऱ्या नागरिकांना या ठिकाणी स्वच्छ स्वच्छतागृहे व स्वच्छ परिसर पाहायला मिळेल. अशा उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षी तुरळक पाऊस

**माथेरान : बातमीदार**



माथेरानच्या डोंगरमाथ्यावर यंदाच्या जून महिन्यात अगदी तुरळक पावसाची नोंद झाली आहे. ३० जून २०२६ रोजी पर्यंत फक्त २०७ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे.मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी खूपच कमी पाऊस झाल्याचे बोलले जात आहे.

माथेरान गिरीस्थान नगरपालिकेचे कर्मचारी अन्सार महापुळे पर्जन्यमापक यांनी ही माहिती दिली. माथेरान पर्यटनस्थळ हे समुद्र सपाटीपासून जवळपास २६०० फूट उंचीवर आहे.यामुळे चार महिने येथे मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो.माथेरान डोंगर माथ्यावर चार महिन्यात पाच हजार मिलिमीटर इतका पाऊस पडतो.मात्र यंदाच्या वर्षी जून महिन्यात पाऊस फारच कमी पडलेला असून जून महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३० जून रोजी सकाळ पर्यंत २०७ मी.मि पावसाची नोंद करण्यात आली आहे.मागील वर्षीच्या तुलनेत या जून महिन्यात तब्बल एक हजार मिलिमीटर पाऊस हा कमी पडलेला आहे.

## जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP १८९१/२०२४**

**सहदेव नारायण मुंडे** — **अर्जदार**

**विरूद्ध**

**सातपुते विश्वास तानाजी** — **विरूद्ध पक्षकार**

**आणि**

**रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**सातपुते विश्वास तानाजी**
**पत्ता-** केएल ५/२२, सेक्टर ९, ३ ई, कळंबोली, पनवेल, रायगड, महाराष्ट्र - ४१०२१८
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **१०-०७-२०२६** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य गौरी कवडीकर** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस दिनांक **१०-०३-२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

(कोर्टाचा शिक्का)

आदेशावरून
सही/-
सदस्य
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४०००01

# 'रोहा प्रेस क्लबचे सर्वच उपक्रम लोकोपयोगी, पर्यावरणाशी एकरूप'

**धाटाव : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दरवर्षी वटपौर्णिमेचे औचित्य साधून विविध ठिकाणी वृक्षारोपण करणाऱ्या रोहा प्रेस क्लबचे सर्वच उपक्रम लोकोपोयोगी, त्यातही पर्यावरण पूरक असतात, झाडे ऑक्सिजन देतात, प्रत्येकाने झाडे लावून आपल्या ऑक्सिजनची सोय करावी, जंगल टिकले, वाढली पाहिजेत, पर्यावरण जागृती व संवर्धनात पत्रकारांचे काम कौतुकास्पद आहे, आजचा वृक्षारोपण हे त्याचेच द्योतक आहे असे प्रतिपादन सुदर्शन कंपनीचे साईट हेड विवेक गर्ग यांनी केले. ते रोहा प्रेस क्लब आयोजित अष्टमी येथील रोहिदास नगर रस्ता दुतर्फा वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते.



दरम्यान,या वृक्षारोपण कार्यक्रमात वणवा विझविण्यात निस्वार्थ महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या किल्ला आदिवासी वाडीतील तरुण मंगेश जाधव व टीमचा विवेक गर्ग व मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला .यावेळी गर्ग यांनी सदर तरुणाला योग्य ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.


रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील रोहिदास नगर येथे रस्ता दुतर्फा वृक्षारोपण कार्यक्रमाचे रोहा प्रेस क्लबने सोमवारी आयोजन केले, दरवर्षी वटपौर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्याची परंपरा यावर्षीही रोहा प्रेस क्लबने कायम ठेवली. महिला कक्ष प्रमुख समिधा अष्टीवकर यांच्या पुढाकारातून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम सुदर्शन कंपनीचे हेड विवेक गर्ग यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी वनपाल प्रवीण शिंदे अध्यक्ष श्याम लोखंडे, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे , रवी दिघे, अमर चंदने, कार्याध्यक्ष नाना खरीवले, पर्यावरण प्रेमी राजेंद्र जाधव, उपाध्यक्ष जितेंद्र जाधव, सचिव रविंद्र कान्हेकर, महेंद्र मोरे, उद्धव आव्हाड, रुपेश रटाटे, विश्वजित लुमन, अंजुम शेटे, केशव म्हस्के व पत्रकार परिवार उपस्थित होता. प्रमुख अतिथी विवेक गर्ग यांनी रोहा प्रेस क्लबच्या सर्वच उपक्रमाचे कौतुक केले, झाडे, जंगल संवर्धन करणे काळाची गरज आहे, यात आमचाही पुढाकार कायम राहिला आहे, प्रत्येकाने आपल्या ऑक्सिजनाची सोय करावी असे सांगत अग्निदमन मंगेश जाधव व वणवा भिजविण्यात अग्रेसर राहिलेल्या तरुणांचे विशेष कौतुक केले, त्यांच्या कामाची दखल प्रेस क्लबने घेतली हेही मनाला भावणारे आहे असे गर्ग यांनी मनोगतात व्यक्त केले,

## बेकायदा डिझेल तस्करीचा पर्दाफाश; दोन बोटींवरील १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मांडवा परिसरात सुरू असलेल्या बेकायदा डिझेल तस्करीचा मोठा पर्दाफाश करण्यात आला असून, दोन बोटींवर छापा टाकून सुमारे १४ लाख ५६ हजार रुपयांचे डिझेल व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत नवखार जवळ रेवस जेट्टी इथं दोन बोटींमधून बेकायदेशीररीत्या डिझेलची वाहतूक व साठा केला जात असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार सोमवारी पहाटे टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात डिझेल, ड्रम, कॅन, पाईप तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १४ लाख ५६ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी पुरवठा अधिकारी हर्षल देशमुख यांनी फिर्याद दाखल केली असून, संबंधित आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कारवाईनंतर गजानन कोळी, अनिल कोळी आणि योगेश पाटील आरोपींना अटक करण्यात आली असून ते उरण तालुक्यातील रहिवासी आहेत. या डिझेल तस्करीमागील संपूर्ण रॅकेटचा पोलीस तपास सुरू आहे.




## झोतीरपाड्यात वटपौर्णिमा उत्साहात साजरी; सुवासिनींकडून पारंपरिक अन् भक्तिभावाने पूजा

**पाली :** रायगड जिल्ह्यात सर्वत्रच वटपौर्णिमेच्या सनानिमित्त धार्मिक व मंगलमय वातावरण पहावयास मिळतेय. पेण तालुक्यातील झोतीरपाडा परिसरात वटपौर्णिमा सण पारंपारिक पद्धतीने आणि भक्तीभावाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच परिसरातील सुवासिनींमध्ये पूजेची लगबग पाहायला मिळाली. साजशृंगार करून हातात पूजेचे ताट घेऊन महिलांनी वडाच्या झाडाजवळ मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. वटपौर्णिमेनिमित्त विवाहित महिलांनी वडवृक्षाच्या मुळाशी पाणी अर्पण करून बुंध्याला सुताचे फेरे घातले. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या परंपरेचे जतन करत महिलांनी श्रद्धेने वडवृक्षाची पूजा केली. वडाचे झाड दीर्घायुषी असल्याने आपल्या पतीला दीर्घायुष्य लाभावे,



### पाहिजेत

**( तुमचा अनुभवांचे उत्पनात रुपांतर करा)**

**सेवानिवृत्त, जेष्ठ, नागरिक, गृहिणी, शिक्षक, बँक कर्मचारी, माजी सैनिक, संस्थापक, स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्यकर्ते, व्यवसाईकाना मर्यादित संधी**

**(पूर्णवेळ किंवा अर्धवेळ सोयीनुसार काम करा)**

**संपर्क क्रमांक :- ९९६७५१४८६१, ९९८७३६६८४१**

**सही/-**
**श्रीमती. वैशाली रामकृष्ण ठाकूर.**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खाली तक्यात नमुद केलेली शेतजमिन मिळकत माझे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक **कौशल प्रवीणकुमार दवे** यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. माझे अशिल विकत घेत असलेल्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.....

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- पाली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. व उपविभाग | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४८ | ०-४९-६० | ६.९७ |
| ५४ | ०-२५-३० | ३.३१ |
| ५७/१० | ०-३८-४० | ६.२२ |
| ५७/११ | ०-१२-६० | ०.२५ |
| ५७/१३ | ०-००-८० | ०.१२ |
| ५७/१८ | ०-४०-५० | ४.४४ |
| ६१/५ | ०-४५-२० | ४.६२ |
| ६६/३ | ०-७७-४० | १.३१ |

याप्रमाणे वर नमुद मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वर नमुद मिळकतीबाबत झालेल्या व्यवहारांस व मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गव्हाण, दान बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिज, लिएन, सदर मिळकतीतुन जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकल लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीविक्रीकरार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- ०१/०७/२०२६**

**सही/-**
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**
कार्यालयीन पत्ता :- गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपीग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड,
मोबाईल नं. ८०९७३९९३३१
ई मेल आय.डी. - dsk८४०@gmail.com

### सावधान नोटीस

तमाम लोकांस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत जमिन मालक श्री. रमेश बाळाराम फडके व इतर १४ यांचे सामाईक नांवे गाव नमुना नं. ७/१२ सदरी दाखल आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोनशेत, ता. पनवेल, जि. रायगड**

| गावाचे नांव | सर्व्हे नं/हि.नं. | एकूण क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार | कब्जेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| मौजे बोनशेत, ता. पनवेल, जि. रायगड | ३/११ | १-३८-३० | १८-१४ | श्री. रमेश बाळाराम फडके व इतर १४ |

वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये माझे अशिल श्री. रमेश बाळाराम फडके यांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरहू मिळकतीमध्ये माझे अशिलांचे २०० चौ. फुटाचे घर आहे. सदरहु घराचा नंबर ग्रुपग्रामपंचायत चिपळे यांचे कार्यालयांत मालमत्ता नं. १७९/ब अशी नोंद आहे. सदरहु मिळकतीमध्ये माझे अशिल हे भात शेतीचे पीक घेत असुन सदरहु मिळकत ते कसत आहेत. सदरहु संपुर्ण मिळकत ही माझे अशिलांचे ताबेकब्जा वहिवाटीत आहे. माझे अशिलांचे अविभक्त हिश्याची मिळकत त्यांनी कोणासही विकी करणेकामी करार अथवा बोलणी केलेली नाही. तरी देखील दि. १८/६/२०२६ रोजीच्या दैनिक राम प्रहार या वर्तमानपत्रामध्ये वर नमुद केलेली संपुर्ण मिळकत विकी करणेकामी ॲड. अपेक्षा दामोदर पाटील यांचे मार्फत जाहिर नोटीस दिलेली आहे. सदरहु नोटीस ही बेकायदेशीर असुन माझे अशिलांनी त्यांना याबाबत जाब विचारलेला आहे.

दि. १८/६/२०२६ रोजीचे जाहिर नोटीस देतेवेळी माझे अशिलांची पुर्व संमत्ती घेतलेली नाही. त्यामुळे दि. १८/६/२०२६ रोजीची जाहिर नोटीस ही बेकायदेशीर असुन ती माझे अशिलांना मान्य व कबुल नाही.

सबब सदर नोटीसीने संबंधितांस कळविण्यांत येते की, माझे अशिलांचे पुर्व परवानगी शिवाय वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत माझे अशिलांच्या अविभक्त हिश्याचे मिळकतीबाबत कोणताही खरेदी विक्री व्यवहार करु नये व तसे केल्यास माझे अशिल सदर खरेदीदार यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई योग्य त्या सक्षम न्यायालयात / कार्यालयात दाखल करतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदार यांची राहील. या उपर देखील कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने अथवा अन्य कोणीही खरेदी अथवा विकी, दान, गहाण, बक्षीस अगर कोणत्याही स्वरुपाचे हस्तांतरण केल्यास ती माझे अशिलांवर बंधनकारक नसुन ती ग्राह्य धरण्यांत येणार नाही याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक : ३०/०६/२०२६**

**सही/-**
**ॲड. नंदकुमार एम. ठोंबरे**
ॲडव्होकेट हायकोर्ट
MAH/६४६०/२०१९

### जाहीर निविदा सूचना

ग्रामपंचायत आदई, ता. पनवेल जि. रायगड यांचेकडून मान्यताप्राप्त अधिकृत पुरवठाधारकांकडून खाली नमूद केल्याप्रमाणे साहित्य व सेवा पुरवठा करण्याकरिता सीलबंद लिफाफा मध्ये निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहेत. निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक वार मंगळवार दि.९/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. सदर प्राप्त निविदा दि. १०/०७/२०२६ रोजी उघडण्यात येतील. सदर निविदा कोणत्याही कारणाशिवाय मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | निधीचा स्त्रोत | तरतूद रक्कम | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे नेवाळी स्मशानभूमी सुशोभिकरण आणि दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी २६-२७ | १,९९,८८८/- | ६ महिने |
| २ | ग्रामपंचायत हद्दीत पाईप गटार बांधकाम करणे (विठ्ठल मंदिर ते जोमा काकडे) | ग्रामनिधी २६-२७ | ४,४७७,३०८/- | ६ महिने |
| ३ | ग्रामपंचायत आदई हद्दीत मेरू आई ते पद् काकडे पर्यंत आर.सी.सी. पाईप लाईन गटार बांधकाम करणे. | ग्रामनिधी २६-२७ | ४,०९,५५३/- | ६ महिने |
| ४ | आदई हद्द्घोतील बंधू ठाकूर ते थोरात रो हाउस पर्यंत गटार साफ सफाई करणे. | ग्रामनिधी २६-२७ | ९९,५८८/- | ६ महिने |
| ५ | संकल्प बौध विहार दुरुस्ती करणे आणि रंगरंगोटी करणे | ग्रामनिधी २६-२७ | ९९,८१३/- | ६ महिने |
| ६ | ग्रामपंचायत हद्दीत सार्वजनिक तलाव त इंद्रप्रस्त सो पर्यंत गटार साफ सफाई आणि दुरुस्ती करणे | ग्रामनिधी २६-२७ | १५०,०००/- | ६ महिने |
| ७ | ग्रामपंचायत हद्दीत क्वालिटी कॉम्प्लेक्सते सत्यज्योत सो. पर्यंत गटार साफसफाई करणे. | ग्रामनिधी २६-२७ | ५,००,०००/- | ६ महिने |

अटी व शर्तीः-
१) अर्जदारांना सदर विकास कामाची कोरी निविदा पत्र दि. ०१/०७/२०२६ ते दि. ०९/०७/२०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यलयात उपलब्ध होतील.
२) भरलेली सिलबंद निविदा दि.०९/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३) आलेल्या निविदा दि. १०/०७/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रामपंचायत आदई यांचे नावे असावा.
५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६) निविदा फॉर्म किंमत ना परतावा राहील.
७) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
८) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार राहावे लागेल.
१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकन प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायतीच्या खाली करायचे आहे
१२) निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१३) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१४) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१५) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१६) शासकीय नियमाप्रमाणे देयकातून शासकीय कपात करण्यात येईल.
१७) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार प्रशासक यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**श्रीमती. स्वप्नाली प्रशांत बागल**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत आदई**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**संतोष नामदेव ठोंबरे**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत आदई**
**ता.पनवेल, जि.रायगड**

# फिफा वर्ल्डकपमधून जर्मनी 'आऊट'



**बोस्टन : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपमध्ये झालेल्या अटीतटीच्या सामन्यात पॅराग्वेने चार वेळच्या विश्वविजेत्या जर्मनीचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा पराभव करत स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. या ऐतिहासिक विजयासह पॅराग्वेने 'राउंड ऑफ १६'मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. पॅराग्वेचा फुटबॉल इतिहासातील जर्मनीविरुद्धचा सर्वात मोठा विजय मानला जात आहे.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये जोरदार चुरस पहायला मिळाली. पहिल्या हाफमध्ये पॅराग्वेच्या जुलिओ एनसिसो याने एक शानदार हेडर करत आपल्या संघाला १० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र दुसऱ्या हाफमध्ये जर्मनीने जोरदार पुनरागमन केले. फ्लोरियन विट्र्जच्या उत्कृष्ट क्रॉसवर काई हैवट्र्जने सुरेख हेडर करत जर्मनीला १-१ अशी बरोबरी साधून दिली.

निर्धारित ९० मिनिटांनंतर सामना अतिरिक्त वेळेत पोहचला. वेगाने धावणाऱ्या खेळाडूंमध्ये प्रचंड थकवा दिसत असतानाच जर्मनीच्या जोनाथन ताह याने गोल केला होता, मात्र फाऊल झाल्यामुळे पंचांनी हा गोल रद्द केला.

## पॅराग्वेकडून पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव

१२० मिनिटांचा खेळ संपल्यानंतरही गोलसंख्या १-१ अशीच राहिल्याने सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला.

पेनल्टी शूटआऊटमध्ये पराग्वेचा गोलकीपर ऑरलँडो गिल सामन्याचा खरा हिरो ठरला. त्याने जर्मनीच्या दोन पेनल्टी उत्कृष्टपणे अडवून संघाचे विजेतेपद सुकर केले. त्यानंतर पॅराग्वेच्या जोसे कनाले याने निर्णायक पेनल्टी गोलमध्ये रूपांतरीत करत संघाच्या ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.

'पेनल्टी शूटआऊट'नंतर विजय हा जर्मनीने चार दशकांहून अधिक काळ विश्वचषकात एक रेकॉर्ड कायम ठेवला होता, मात्र यंदाच्या विश्वचषकात हा रेकॉर्ड मोडित निघाला. या पराभवासह चार वेळच्या जागतिक विजेत्या जर्मनीला विश्वचषक इतिहासातील पहिल्यांचा पेनल्टी शूटआऊट पराभवाचा धक्का बसला आणि विश्वचषकातील सर्वात प्रदीर्घ काळापासून असलेला एक ऐतिहासिक विक्रम मोडीत निघाला.

# राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्र विजेता




**पाली : प्रतिनिधी**

१४व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेचे आयोजन इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनने छत्रपती संभाजीनगर येथील इनडोअर हॉलमध्ये केले होते. या स्पर्धेत १४ सुवर्ण, सात रौप्य आणि १६ कांस्यपदक जिंकून महाराष्ट्र राज्याने विजेतेपद पटकाविले. या खेळाडूंमध्ये पालीसह रायगडातील खेळाडूंचा मोठा सहभाग होता.

## रायगडच्या खेळाडूंचा विशेष सहभाग

स्पर्धेमध्ये २८ राज्ये आणि आठ केंद्र शासित प्रदेशातील १९०० खेळाडू सहभागी झाले. १० सुवर्ण, चार रौप्य व दोन कांस्यपदके मिळवून उत्तराखंडने दुसरा, तर नऊ सुवर्ण, १४ रौप्य व १७ कांस्यपदक मिळवून जम्मू आणि काश्मीरने तिसरा क्रमांक प्राप्त केला.

उत्कृष्ट खेळाडू म्हणून रूद्र येवले, इंद्रा बनसोडे, निर्मयी भानूशाली (तिघेही महाराष्ट्र), दनस्वी शर्मा (दिल्ली), अहमद ताह, मोहम्मद अलीम (जम्मू आणि काश्मीर), आदिना नईम (छत्तीसगड), सुजित (चंदिगढ) या खेळाडूंना गौरवण्यात आले. इंडियन पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले यांनी यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जितू पॅकर्स संघ रायगड गाबीत चषकाचा मानकरी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

गाबीत समाज संस्था रायगड विभाग आयोजित पावसाळी रबर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नुकतेच कामोठे सेक्टर २२ येथील दि.बा. पाटील क्रीडांगणावर करण्यात आले होते. या स्पर्धेत जितू पॅकर्स संघाने अंतिम सामन्यात बाजी मारून रायगड गाबीत चषक पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते आणि गाबीत समाज संस्था रायगड विभागाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले, तर सामजिक कार्यकर्ते सुनील गोवारी, गौरव पोरवाल यांनी उपस्थित राहून स्पर्धेला शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग नोंदविला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात जितू पॅकर्स संघाने महापुरुष तांबळडेग संघावर मात करत रायगड गाबीत चषकावर आपले नाव कोरले. मालिकावीर विक्रांत रोगे, सर्वोत्कृष्ट फलंदाज दत्तात्रय लोणे, सर्वोत्कृष्ट गोलंदाज कल्पेश केरकर आणि सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून हर्षवर्धन रोगे व तेजस केळुसकर यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व खेळाडूंना गौरविण्यात आले.

गाबीत समाजातील दहावी व बारावी २०२६ परीक्षा पास झालेल्या अन्वी रवींद्र बांदकर, शरयू प्रशांत मोंडकर, सई दीपक मणचेकर, प्रांजळ विक्रम जुवाटकर, आयुष दीपक ढोके, रिया दीपक मणचेकर, आयुष अभिषेक बांदकर, निर्जा रामचंद्र धावडे, हर्षिता दीपक मणचेकर या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# नवी मुंबई आणि रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळातर्फे नवी मुंबई आणि रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा ११ व १२ जुलै रोजी नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात आयोजित करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनचे खजिनदार व रायगड जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन त्यांच्याच हस्ते ११ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता होईल.

स्पर्धा नवोदित, ११, १३, १५, १७, १९ वर्षांखालील मुले आणि मुली, महिला व पुरुष, वरिष्ठ पुरुष, ४० वर्षावरील अशा विविध गटांमध्ये घेण्यात येणार आहेत. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी.आर. साळसकर, शामल आणि योगेश पवार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

स्पर्धेत नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील नामवंत खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे

# आयर्लंडच्या मुख्य प्रशिक्षकाचा अचानक राजीनामा

**बेलाफास्ट : वृत्तसंस्था**

भारताविरुद्ध झालेल्या दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेत यजमान आयर्लंड संघाने पहिल्यांदाच विजय मिळवला. भाराताविरुद्ध मिळवलेला निर्भेळ मालिका विजय आयर्लंडच्या इतिहासातील ऐतिहासिक क्षण ठरला. संघ विजयाचा आनंद साजरा करत असतानाच आयर्लंडच्या कोचने प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला.

आयर्लंडच्या पुरुष क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक हेन्रिक मलान यांनी आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. चार वर्षांहून अधिक काळ संघाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला. भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० असा ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर अवघ्या एका दिवसात त्यांनी ही घोषणा केली.





# मध्य रेल्वेच्या खेळाडूंची कॉमनवेल्थ गेम्ससाठी निवड

**रोहा : प्रतिनिधी**

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे २३ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या प्रतिष्ठेच्या कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मध्य रेल्वेच्या दोन खेळाडूंची निवड झाली आहे. या खेळाडूंमध्ये धावपटू तेजस शिर्से आणि गोळाफेकपटू समरदीप सिंग गिल यांचा समावेश आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील हे दोन्ही खेळाडू आहेत. तेजस शिर्से हा कमर्शियल क्लर्कसह तिकीट कलेक्टर म्हणून, तर समरदीप सिंग गिल वरिष्ठ लिपिक कार्यरत आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली असून भारतीय रेल्वे व मध्य रेल्वेचे नाव उंचावले आहे. दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करतानाच प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचीही मध्य रेल्वेने प्रशंसा केली आहे.

# मोरोक्कोची नेदरलँड्सवर ३-२ने सनसनाटी मात



**ग्वादालुपे : वृत्तसंस्था**

जेतेपदाचे दावेदार असलेल्या संघांपैकी नेदरलँड्सलाही घरी परतावे लागणार आहे. मोरोक्कोने राऊंड ऑफ ३२च्या लढतीत नेदरलँड्सवर मात करत सनसनाटी विजयाची नोंद केली. निर्धारित वेळेत हा सामना १-१ असा संपला. पेनल्टी शूटआऊटमध्ये मोरोक्कोच्या खेळाडूंनी ३-२ अशी बाजी मारली.

पेनल्टी शूटआऊटमध्ये तेऊन कूपमाईनर्सने नेदरलँड्ससाठी पहिला गोल केला. मोरोक्कोच्या नील आयोनायला गोल करता आला नाही. नेदरलँड्सच्या जस्टीन क्लुईव्हर्टने केलेला गोल प्रयत्न विफळ ठरला, मात्र त्यानंतर मोरोक्कोच्या राहिमीने गोलची बोहनी केली. नेदरलँड्सच्या वॉट वेघोर्स्टने गोल केला. त्याला प्रत्युत्तर देत मोरोक्कोच्या चेम्सडाईन तैबीने गोल करत बरोबरी साधली.

यानंतर नेदरलँड्सचं नशीब रूसलं. क्विंटन टिंबरने केलेला गोलप्रयत्न गोलपोस्टच्या दुरून निघून गेला. मोरोक्कोच्या अचरफ हाकिमीने केलेला गोल प्रयत्नही वाया गेला. ख्रिस्नेस्को समरव्हिलेने केलेला गोलप्रयत्न खांबाला आदळून बाहेरच्या दिशेने गेला. मोरोक्कोला शेवटची संधी होती. इस्माइल सैबारीने अचूक गोल करत मोरोक्कोला ३-२ असा विजय मिळवून दिला.

# आशियाई खेळांसाठी भारतीय महिला क्रिकेट संघाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीने येत्या सप्टेंबर २०२६मध्ये जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई खेळांसाठी भारतीय महिला क्रिकेट संघाची निवड घोषणा केली आहे. भारताची अनुभवी फलंदाज हरमनप्रीत कौर संघाचे नेतृत्व करणार असून स्मृती मंधाना हिच्या खांद्यावर उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

भारतीय महिला संघ गतविजेता म्हणून उतरणार आहे. २०२३मध्ये चीनमधील हांगझूत झालेल्या आशियाई खेळांमध्ये भारतीय महिला संघाने क्रिकेट स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली. यंदाही सुवर्णपदकाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा, रिचा घोष (यष्टीरक्षक), जी. कमलिनी (यष्टीरक्षक), भारती फुलमाली, श्री चरणी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, अरुंधती रेड्डी, श्रेयंका पाटील, राधा यादव आणि नंदनी शर्मा.

# जपानला नमवून ब्राझील उपउपांत्यपूर्व फेरीत



**ह्युस्टन : वृत्तसंस्था**

आशियाई वाघ मानल्या जाणाऱ्या जपानच्या जबड्यातून अक्षरशः विजय खेचून आणत ब्राझीलने अगदी शेवटच्या क्षणी मार्टिनेलीच्या गोलमुळे बाजी मारली आणि या सनसनाटी विजयासह फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

वास्तविक, सानोच्या गोलमुळे जपानने १-० अशी अनपेक्षित आघाडी घेत ब्राझीलला वर्ल्डकपमधून जणू एक्झिटच्या दारात उभेच केले होते, मात्र प्रारंभी कॅसेमिरोने बरोबरीचा गोल केला आणि त्यानंतर सामना एक्स्ट्रा टाईममध्ये जाणार अशी चिन्हे असताना मार्टिनेलीने भरपाई वेळेत शेवटच्या मिनिटाला गोलजाळ्याचा अचूक वेधघेत ब्राझीलच्या सनसनाटी विजयावर शिक्कामोर्तब केले.

## मार्टिनेलीचा निर्णायक गोल

बाद फेरीतील (राऊंड ऑफ ३२) या अत्यंत चुरशीच्या सामन्यात पहिल्या हाफअखेर जपानने ब्राझीलविरुद्ध १-० अशी अनपेक्षित आघाडी घेतली. सामन्याच्या २९व्या मिनिटाला जपानचा मिडफिल्डर काइशू सानो याने ब्राझीलचा कर्णधार डॅनिलोचा पास मध्यभागी अडवला. त्यानंतर त्याने चेंडू वेगाने पुढे नेत बॉक्सच्या बाहेरून एक अचूक आणि ताकदवान लो-स्ट्राईक शॉट मारला. ब्राझीलचा स्टार गोलरक्षक ॲलिसन बेकरला चकवत हा चेंडू थेट नेटच्या डाव्या कोपऱ्यात गेला आणि जपानला १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली.

दुसऱ्या सत्रात निर्णायक क्षणी गॅब्रिएल मार्टिनेलीने सनसनाटी विजयी गोल नोंदवत ब्राझीलचा पुढील फेरीतील प्रवेश सुनिश्चित केला.